किरकोळ अंकास........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10 .. 4as.
Repetition derline3as

THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII | AKOLA MONDAY 4 FEBRUARY 1889 | NO.5.

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख ४ माहे फेब्रुवारी सन १८८९ इ० | अंक ५.

*K. B. Rele and caclousco smosteffi .*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतीमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या शेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२परम्यावर खात्रीचे दस्तादं औषध.

हें त्रिदोषक अयुर्व त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, टिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती ही जुना व हट्टी अ[illegible] तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

[illegible] ही परम्यावर रामबाण आहे. किं० ० [illegible] आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येतें. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखम्या घाय इ० मिटविणारे मलम कायतें हेच किं० ८ आणे.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा जातो, क्षयाचा,, डांग्या घशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हे रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें व स्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हे कधींच मागें हटले नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या अहित त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिली. तीं फार गुणकारीं असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी"

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो धाऊक घेणारास चांगल कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना--आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, दा[illegible]चीं तेलें मलम, साबू, पोव्यारा, टिंक्चर्स, सल्ईन्स, [illegible], फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य खबरांचे पाठविण्यांत यतील त्याच प्रमाणें औषधांची व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत यतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

पत्ता. के. बी. रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल स्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

"TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who appliesg to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

बहिऱ्यांस

बहिरेपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद गुण आणणारे सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.

राजमाचीकर व साठे न्यायाश्रपकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.
हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.
सन १८७२ चा ९ वा
कमजुतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यां सुद्धां
किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.

वऱ्हाडसमाचार.

मिती माघ शुद्ध ४ शके १८१०

( लिहून आलेला मजकूर. )

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

साहेब—बरें रामपाल तुह्मी तर अगदीं एखाद्या पोरा प्रमाणेंच भकूं लागला अहां. त्या कांग्रेसवाल्या लोकां प्रमाणें तुमच्याही डोक्यांत हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें सध्यां वारें भरलें आहेसें दिसतें, ह्मणून मी तुह्मास एक दिवसाची सवड देतों, तुह्मी जर आपला पक्का बेत काय झाला आहे हें मला उद्यां कळवाल तर मी तुमचा फार आभारी होईन. तुह्मी फार चांगले, सुज्ञ व प्रामाणिक गृहस्थ आहात व त्या प्रमाणें मी तुमची नेहमीं प्रशंसा ही केलेली आहे, ह्मणून मी तुमची सरकारी वकिली काढून घेण्यास फार नाखूष आहे, अलबत तुमच्या सारख्या गृहस्थास तिच्या पासून मोठासा फायदा आहे ह्मणून काढून घ्यावयाची असें जरी नाहीं, तरी लोकांत तरी आपली बरीच नाचक्की करील. आतां खाजगी नात्यानें खरेंच जर पुसाल तर तुमच्या कांग्रेसला जाण्यास माझा स्वतःचा कोणत्या ही प्रकारचा अडथळा नाहीं, तरी आपले बुढे कमिशनर ह्या विषयीं मोठे दक्ष आहेत आणि त्यांनीं मला स्पष्ट कळविलें आहे कीं, तुह्मी जर राष्ट्रीय सभेस जाल तर तुह्मास तुमच्या सरकारी वकिलीवर पाणी सोडावें लागेल. तुह्मास जें कां[illegible] कळवावयास मला सांगितलें होतें ते तुह्मा[illegible] सांगितलें आहे आतां तुह्मास जें कांहीं करणें असेल तें करावें.

हा संवाद झाल्या नंतर बाबुरामपाल आपल्या घरीं गेले आणि त्यांचा निश्चय तिळप्राय सुद्धां जरी ढळला नव्हता तरी त्यांनीं उगीच आपला चारचौघां मित्रांस ह्या कामांत सल्ला विचारला. आणि सरते शेवटीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांनीं कलेक्टर साहेबांस एक पत्र लिहून त्यांत आपला राष्ट्रीय सभेस जाण्याचा निश्चय झाला आहेसें कळवून त्या सोबतच सरकारी वकिलीचा राजीनामा पाठवून दिला.

गुरुवारीं सकाळीं गोपाळ नगरांत जिकडे तिकडे धांदल उडून गेली. मोठमोठ्या रस्त्यांतून खुप गर्दी जमत चालली, गावांतील मुलें निशाणें हातांत घेऊन व गाण्याचे चुटके ह्मणत टिकडून तिकडे हिंडत होते ह्या सर्व गर्दीचें कारण त्या दिवशीं संध्याकाळच्या गाडीनें राष्ट्रीय सभेकरितां निवडलेले लोक अलाहाबादेस जाणार हें होतें. बाबूरामपाल ह्यांच्या दारापाशीं ३ वाजल्या पासूनच खूप गर्दी जमली होती. परंतु त्याच वेळेस आंतून एकदम रडण्याचा अवाज ऐकूं आला, कारण त्यांचा सहा वर्षांचा मुलगा एकाएकी पटकीनें पछाडला. ह्मणून त्याची आई हंबरडा फोडित होती व आपल्या पतीनें त्या मरणोन्मुख झालेल्या एकुलत्या एक मुलास सोडून जाऊं नये ह्मणून त्याच्या विनवण्या करीत होती. बाबू त्या बिछान्या शेजारीं तटस्थ उभे होते त्यांच्यानें एक शब्दही बोलवला नाहीं आणि त्या वेळची स्थितीही पण त्यांची तशीच होती. त्यांच्या बायकोनें त्यांस घट्ट मिठी मारली होती, त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या होत्या व त्यांच्या मुखचर्येवरून ते अगदीं निराश झालेले दिसत होते. निघण्याची वेळ तर अगदीं भरत चालली तरी ज्या डाक्टरास बोलावणें पाठविलें होते तो आला नाहीं त्या योगानें तर त्यास कांहींच सुचेनासें झालें; इतक्यांत डा. दत्त हे येऊन पोहोचले. आतां पांच मिनिटेंच काय ही फुरसत आहे असें पाहून ते डाक्टरास ह्मणाले:-

'मित्रा, आतां हें मूल मी तुझ्या व त्या जगदिशाच्या पदरांत घालतों. जर त्या जगदोद्धाराचीच इच्छा असेल ह्याची आणि आमची ताडातोड करावयाची असेल तर मी तरी येथें असून काय करणार आहे. ह्या मुलास वाचविण्याचे हरएक उपाय तूं करशीलच अधिक तरी आपल्या हातून काय होणार आहे. ज्यानें ह्याला जन्मास घातले त्या वरतीच सर्व हवाला ठेवला पाहिजे.

इतके बोलून ते आतून बाहिर पडले व बाहेर उभे असलेल्या मित्रांशीं दोन शब्द बोलून तडख आपल्या गाडींत जाऊन बसले व दुसऱ्या मुखत्यार लोकांना बळजोरीनें आंत बसविले आणि गाडी स्टेशनकडे वळवावयास सांगितलें. ईश्वरास अंत पहाणें ह्मणजे तो एक तऱ्हेनें पहात नसतो स्टेशन वरती एका मोठ्या राज्याचा मुखत्यार आमच्या बाबू साहेबांस वकीलपत्र देण्यास आला व खटला चालूं राहीपर्यंत दररोजच तीनशें रुपये देण्यास तयार होता परंतु बाबुराम पालनीं त्यास सवड नाहीं म्हणून साफ सांगितले व तिकीट आफिसचा रस्ता धरला.

ह्यांच्या डब्यांत एक मदीरेनें धुंद झालेले गैरकाय दाळ बसले होते ते सितारामपूरच्या स्टेशनावर उतरले व जांता जातां बाबूच्या सोनेरी छडीवर हात मारला.

पूर्ण कसोटीस लावल्यावर ईश्वर दया करतोच त्याच प्रमाणें अलाहाबादेस पोहोंचल्यावर बाबूसाहेबास एक तार मिळाली व त्यांत त्याच्या मुलाच्या खुशालीची सूचना लिहिली होती ह्या वेळेस त्यांस किती आनंद झाला असेल बरें ! बापाचेच हृदय तें तेव्हां त्याच्या आनंदाची कल्पना वाचकांनींच करावी. त्यांनीं मनो भावेंकरून ईश्वराची प्रार्थना केली व यावज्जन्म राष्ट्रीय सभेचा पूर्ण

हितकर्ता होईन म्हणून तेथेंच शपथ घेतली. असे पुरुष आम्हा हतभागी हिंदुस्थानवासी जनांच्या कितीकसें वाट्यांस आले आहेत! पुरत्या हाताच्या बोटांएवढें सुद्धां भरणें कठीण.

(अंक १ वरून पुढें चालूं.)

सिंध प्रांतांतील सभेचे मुख्य उत्पादक रा. रा. दयाराम गिडूमल हेच आहेत व त्यांच्याच परिश्रमानें आज ही सभा या स्वरूपास येऊन पोहोंचली आहे. कोणच्याही सभेस किंवा पक्षास बळकटी येण्या करितां प्रथम जुटीची जरूरी आहे. व ती जूट हरतऱ्हेनें बनविली पाहिजे जूट जर नाहीं. तर कांहींच अर्थ नाहीं व ही जूट कायम रहाण्या करितां च यांनीं जे नियम काढले आहेत ते चांगले नाहींत असें कोणीही ह्मणणार नाहीं कारण असे नियम असल्या शिवाय आजच्या स्थितींत समाजाची स्थिति सुधारणें फार कठीण आहे. ही गोष्ट खरी आहे कीं प्रत्येक समाजांत झटून काम करणारे व आपल्या स्वतःस झीज लावणारे कांहीं लोक असतातच. त्यांत कित्येक आपल्या ज्ञानानें झटतात, कित्येक पैशानें झटतात व कित्येक आपल्या आंगमेहनतीनें झटतात. ज्या सभास अशी सर्व प्रकारें मदत असते त्याच काय त्या उन्नतीस येतात. नाहीं तर अल्पायुषी सभा पुष्कळच होतात. या बद्दल उदाहरण पहाण्यास फार लांब जाण्याची जरूरी नाहीं सर्वांना माहीत आहे कीं सन १८८७ सालांत अकोलें येथें गणेश मंदिरांत एक मोठी टोलेजंग सभा भरली होती व समाज सुधारणा कशी व्हावी या बद्दलची तीव भवतीनभवती होऊन शेवटीं सर्वानुमतें कांहीं ठरावही झाले न ते ठराव होईल तों पर्यंत पाळण्या बद्दल बहुतेक सभासदांनीं अनुमोदन दिलें हुकेंच नाहींतर कित्येकांनीं तर स्वहस्तुरच्या सह्या ही केल्या. परंतु "पुराणांतलि वांगीं पुराणांत" या म्हणी प्रमाणें या सभेंतील ठरावाचा निकाल लागला कारण त्या प्रमाणें वर्तन करण्यास आज एखादा तरी सभासद तयार असेल किंवा नसेल याची शंकाच आहे. सही करणारा पैकीं कित्येकांचें तर त्या विरुद्धही वर्तन चालूं आहे. हे आह्मांला खास माहीत आहे. जेथें नियमा विरुद्ध वागण्या बद्दल कोणताच प्रतिबंध नाहीं किंवा विरुद्ध वागविल्यास शिक्षा नाहीं तेथें असा परिणाम होणें साहजिकच आहे. इंडियन पिनलकोडामध्यें ज्या शिक्षा सांगितल्या आहेत त्या शिवाय करून व फौजदारी कोर्टांना जे अधिकार दिले आहेत ते शिवाय करून हल्लीं इंडियन पिनलकोडामध्यें जितकीं कलमें आहेत त्याच्या दुप्पट जरी वातलीं असतीं तरी त्यापासून कांहीं फायदा झाला असता काय! नाहीं फार कशाला हरएक जातींतील व धर्मांतील लोकांना अमुक प्रकारचें वर्तन ठेवलें पाहिजे अशाबद्दल प्रत्येक जातींत व धर्मांत नियम आहेत त्याचप्रमाणें त्या नियमा विरुद्ध वर्तन झाल्या बद्दल दंड ही सांगितला आहे. व आजपर्यंत हरएक जातींतील मनुष्य आपल्या जाती विरुद्ध वागण्यास धजत नसे परंतु अलिकडे कायदेकौन्सिलच्या कायद्या पुढें या शिक्षा रद्द झाल्यामुळें थोडे कां लोक आपला धर्म सोडतात पावरून एवढें खरें आहे कीं कांहीं तरी आटकाव असणें जरूर आहे व तो ज्या सभेंत नाहीं त्या सभेपासून काय फायदा होणार! रा. रा. दयाराम यांच्या ह्मणण्या प्रमाणें सभांस नुसती जागा व नांव मिळालें ह्मणजेच त्या चांगल्या चालतात असें नाहीं तर ज्या सभेचा काय करणारा चिटणीस पगारी असतो त्याच चालतात व भरभराटीस येतात तर आपली सभा खरोखर भरभराटीस यावी व चिरायुषी व्हावी अशा हेतूनें जर कोणास सभा स्थापिणें असेल तर त्यांनीं खालील तीन गोष्टी अवश्य ठेविल्या पाहिजेतः—

१ सभेंत एक पगारी चिटणीस मिळविला पाहिजे.

२ सभे करितां एक स्वतंत्र ठिकाण मिळविलें पाहिजे.

३ सभेंत जें काम होईल याची लोक समाजास माहिती दिली पाहिजे.

वरील गोष्टीपैकीं एकाहीं गोष्टीची गणेश मंदीरांतील सभेस मदत नसल्या कारणानें ती गणेश मंदीरांतच श्री गजाननाच्या पायीं समर्पण झाली यांत कांहीं नवल नाहीं.

सिंध सभेचे हेतु खालीं लिहिल्या प्रमाणें आहेतः—

(१) अकाली विवाह न करणें.

(२) लग्नांतील खर्च कमी करणें.

(३) स्त्री शिक्षण वाढविणें. आणि स्त्रियांच्या स्थितीची उन्नति करणें.

(४) वरील सर्व हेतु साधण्यास ज्या कायदेशीर गोष्टींचें साहाय्य लागेल त्या कारणें या सभेस जी वर्गणी उत्पन्न होते तिचा सभासदांस नफा किंवा बक्षिस या ऐवजी व्यय केला जात नसून फक्त सभेच्या कामा करितांच केला जातो.

या सभेंतील सभासदांचे एकंदर चार वर्ग केले आहेत व त्या मुळें कोणाला ही गैर सोय होण्याचा संभव नाहीं.

वर्ग पहिला— खालील गोष्टी ज्यांना कबूल आहेत त्यांचा (१) आपल्या स्वतांच्या मुलांचे अगर आपल्या ताब्यांतील मुलांचें लग्न १६ वर्षांचे आत करणार नाहीं, व हा नियम जर पाळतां आला नाहीं तर ५०० रुपये अगर त्या वर्गांतील लोक जी रकम दंडा दाखल देण्यास सांगतील ती देऊं. (२) आह्मी आपल्या मुलां करितां अगर नातलगां करितां या वर्गांतील सभासद जो हुंडा ठरवितील त्या पेक्षां ज्यास्त घेणार नाहीं घेतल्यास दुप्पट दंड देऊं. (३) आह्मी आपल्या मुलींना आमचे कडून होईल तितकें शिक्षण देऊं; व निदान त्यांस लिहितां वाचतां येईल व साधारण हिशेब येतील इतकें शिक्षण देऊं. (४) दरमहा १ आणे वर्गणी देत जाऊं अथवा वर्षाची अगाऊ एक रुपया देत जाऊं.

वर्ग दुसरा— वरील चार गोष्टींपैकीं दुसरी गोष्ट वगळून ज्यांना बाकीच्या सर्व अटी मान्य आहेत ते दुसऱ्या वर्गांतले सभासद मानले जातील.

वर्ग तिसरा— ज्यांना सभेचे उद्देश स्तुत्य वाटतील जे सभेस दरमहा ८ आणे किंवा वर्षाची ६ रुपये वर्गणी देतील ते तिसऱ्या वर्गांतील सभासद समजावे.

वर्ग चौथा— सभेला उदार हस्तें कोणी मदत केल्यास अगर स्त्री शिक्षण अगर दुसऱ्या सामाजिक सुधारणे संबंधानें मदत केल्यास आनररी मेंबर नेमावे. असे सभासद चवथ्या वर्गांतले होत.

वर जे वर्ग दिले आहेत त्यांत पहिल्या तीन मध्यें हिंदुलाच काय ते सभासद होता येते परंतु चवथ्या वर्गांत कोणास येण्यास प्रतिबंध नाहीं ५० रुपये दिल्यास पहिल्या दोन वर्गांतील सभासदांस लाईफ मेंबर्स होता येते. व २०० रु. दिल्यास तिसऱ्या वर्गांतील लोकांस लाईफ मेंबर्स होता येते. लाईफ मेंबर्सनीं एकदां वर्गणी दिल्यावर पुन्हा त्यांना वर्गणी द्यावी लागत नाहीं.

वरील करार नोंदल्यावर व्यवस्थापक मंडळीनें परवानगी दिल्यावर जे जे पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या नंबरच्या रजिष्टरांत सह्या करतील ते ते त्या वर्गांतील अनुक्रमें सभासद समजावे. या शिवाय आनररी सभासद ही निवडले जातात परंतु ते फक्त जनरल सभेचें वेळेसच निवडले जातात. एकदां नांव नोंदलें गेल्यावर काढून घ्यावयाचें असल्यास, दंड दिल्याशिवाय काढतां येत नाहीं. येणेंप्रमाणें सिंध सभेचे हेतु व नियम आहेत वर लिहिलेल्या धर्तीवर जर गणेश मंदिरांतील सभा चालूं होईल तर ती ही उन्नतीस आल्यावांचून रहाणार नाहीं. या करतें गणेश मंदिरांतील सभेचे उत्पादक लक्ष देतील काय!

मि. केन पार्लमेंटचे एक सभासद हे सध्यां हिंदुस्थानांत फिरून मद्यपान निषेधक व्याख्यानें देत फिरत आहेत हें आमच्या वाचकांस माहीत आहेच. मद्यपानाचा प्रसार आमच्या लोकांत सध्यां कसा होत आहे व त्या मुळें सरकारची तुंबडी कशी भरत आहे या बद्दल ते जागोजाग व्याख्यानें देऊन या दुष्ट व्यसना पासून लोकांची मनें वळवीत फिरत आहेत हा त्यांचा आपल्या लोकांवर अनुग्रह च आहे. सरकारनें आपकारी खात्याची स्थापना केली आहे ती वाईकून हिसाबपास मद्यपानाला एक प्रकारें आडकाठी घालावी या उद्देशानें आहे तथापि त्यांनीं या संबंधानें जी माहिती सांगितली तिवरून पहातां त्याचा परिणाम कोणत्याही प्रकारें मद्यपानास प्रतिबंध न होतां ते दिवसें दिवस अधीक अधीक वाढत आहे या संबंधानें त्यांनीं जे आकडे सांगितले ते पाहिले असतां कोणाला ही आश्चर्य वाटल्या वांचून राहणार नाहीं.

अपकारी खात्याची स्थापना २१ वर्षी पूर्वी झाली व तेव्हां पासून त्याचा प्रवाह एखाद्या नदीच्या प्रवाहा प्रमाणें एक सारखा अधीक अधीक वाढत चालत आहे. सन १८७४ सालीं दारूच्या मक्त्याचें उत्पन्न सरकारला २२१ लक्ष रुपये झालें होतें व या सालापासून १८७९ सालापर्यंत ते ३२० लक्ष होई पर्यंत वाढलें. हा वेळ पावेतों अपकारी खात्याला निश्चीत स्वरूप दिलेलें न व्हतें. तें दिलें गेलें यामुळें उत्पन्नाची वाढ अधीकच वाढली. पुढल्या चार वर्षांत ती शेंकडा ६० प्रमाणें वाढली. सन १८८३ सालीं हें उत्पन्न ३६१ लाख रुपये, ८५ सालीं ४०१ लाख, ८७ सालीं ४२७ लाख व यंदा तर त्याहू पेक्षां अधीक होण्याचा सुमार आहे. ही वाढ हिंदुस्थानांत सारखीच होत आहे कारण सर्व प्रांतांत त्याची रचना सारखीच आहे. आतां दारूचा खप कसा होतो तें पहा. आपण उदाहरणार्थ आपल्या शेजारचा मुंबई इलाखाच घेऊं सन १८८२ सालीं त्या इलाख्यांत एकंदर २० लाख ग्यालन दारू गाळून ती सर्व फस्त झाली व ही संख्या १८८६ सालीं तर २७॥ लाख पर्यंत वाढली याशिवाय विलायती दारू बाहेरून आली ती निराळीच हीची संख्या सरासरीनें १० लाख ग्यालन पर्यंत धरली आहे. आमच्यांतील समाज सुधारक इकडे लक्ष देतील काय! बालविवाह, पुनर्विवाह वगैरे गोष्टि साठीं आकाश पाताळ एक करून टाकणाऱ्या आमच्या पुढाऱ्यांनीं हे आकडे ध्यानांत आणून मान खालीं घातली पाहिजे. सरकारला काळजी लागून उत्पन्न होईल तो वाव जेवढा वाटेल तितकी चांगलीच आहे. आमचे सरकार सध्यां पिशवी भरण्याच्या उद्योगास लागले आहे. सरकारच्या उत्पन्नाच्या निरनिराळ्या खात्यांप्रमाणें काढलें तर शेंकड्यांत जंगलचें उत्पन्न ४९, अफूचें ७९, लांकडाचें ८९, जकातीचें ९०, मिठाचें ९२ स्टांपाचें ९६ आणि अबकारीचें ९७ रुपये अशी मालिका लागत आहे हें सर्व कशा मुळें; सरकार आपल्यावर जुलूम करून आपल्या जवळून पैसा हिसकावून घेत नाहीं. आपणच खुषीनें त्यांस देत आहों. आमच्या लोकांनीं अद्याप तरी डोळे उघडावें.

लेडी डफरीन फंडाची वऱ्हाडची शाखा सन १८८७–८८ या वर्षी ७८६१-६-४ रुपये ह्या फंडा बद्दल उत्पन्न झालें. वऱ्हाडांत याची स्थापना १८८६ सालच्या एप्रिल महिन्यांत झाली व तेव्हां पासून १८८७ अखेर पर्यंत १०७९०-१९-१ रुपये वर्गणी जमली होती १८८८ अखेर पर्यंत १८६१२-९-११ या फंडा बद्दल जमा झाले. व ११७४१०४०३ खर्च झाले ह्मणजे सध्यां ४६८७००१०८ इतका रकम शिल्लक आहे. ह्या फंडाच्या खर्चातून दोन सुईणी या प्रांतांत कामें करीत आहेत व एकंदर मुंबई व नागपूर येथें ६ विद्यार्थीणी सुईणीची कामें शिकत आहेत.

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 4, 1889.

## THE MAY VACATION IN BERAR

It is a matter of great pity that the Resident has not up to this time been pleased to consider the question of the May Vacation in a way in which the whole press of Berar has viewed it for the many years past. An application was some years ago made to the Resident at Hyderabad Mr. Cordery, who shelved the question, till the advent of the new Judicial scheme. As the Vacation is coming on we feel it our duty to bring to the notice of the authorities the several facts in connection with the extension of the Vacation.

The Vacation in Berar commences at present, from 15th May to 15th June that is, for one month only. Now it is a fact beyond doubt that the heat in Berar is far more oppressive than in the Bombay Presiden-

cy. And the summer is felt sooner here thane else-where. The Vacation therefor in Berar ought to be extended over a period of more than one month as at present. In the Bombay Presidency the Vacation occupies six weeks; and there is every reason why it should be even more here in Berar. But strange to say that it is not only not more but it is actually less.

Again the Vacation actually occupied two months before 1882 and it was then curtailed to one month and since then it has so continued. The Resident's Court and the Courts at Secunderabad do, we believe, even now enjoy a two months summer Vacation. If Vacation for 2 months was necessary and expedient only a few years ago, and if even at the present moment it is considered necessary for some Courts under the Resident, it seems unjust why that same boon should not be extended to all the courts in Berar.

If we see why the Vacation is at all allowed; there is no doubt that the convenience of the suitors is what is the chief reason. People find it very inconvenient to come all the way from their villages under the hot sun; and it is for this reason that Vacation is allowed at all. If then that is the reason then it should be such that it would prove a real boon to them. Not to speak of the period over which the Vacation extends, the date on which it commences is extremely odd. To have the Vacation to commence on 15th May frustrates almost altogether the original object of having any Vacation at all. On the 5th June the monsoon begins and to give only a twenty day's respite to the suitors does them hardly any good. Those that can afford to leave this province during the Vacation also find it inconvenient to leave the province so as to be able to stay out only for 2 or 3 weeks. By 5th June almost all the sanitariums in the Bombay Presidency have to be abandoned, as the early monsoon showers come in by that time. The commencement of the Vacation is thus clearly suited to none.

But besides the benefits which suitors derive from not having to come under a burning sun during the Vacation, there is yet a greater reason why the Vacation should be allowed and also extended. Judicial work entails always such an amount of brain work that officers who have that work constantly can not but have perfect rest. And this is very specially needed in summer. Judges are human beings after all and if they are expected to turn out good judicial work, they must necessarily have rest, as much in the interest of Judges as the suitors themselves. This is also a very important reason why a Vacation is allowed and one is not considered sufficient but two are thought necessary— in England where people never dream of a summer as in India. If that is so in England and in the High Courts in India, why should not the same reasons hold good here in Berar.

But it is said that the suitors hardly care to get any Vacation much less an extended Vacation. That the suitors most of them kunbis have to do field work during the day and coming to Court during all those days does not cause any suffering to them. We assure the authorities that the field work the Berar kunbi doesin summer is done from 3 or 4 in the morning to about 8 or 9 in the morning. And there is absolutely no work done during the day. Such being the facts the Vacation is needed as much in the interests of the kunbi ryot as in that of any body else. Again it is said that the Courts get the last Saturday as a holiday and as the Courts are already closed for 12 Saturdays in a year the Vacation need not be extended. As a matter of fact however many of the Courts are never closed on last Saturdays, as they are generally over worked. This is therefore no reason why the vacation should not be extended.

An application, we hear, is going to be made by the suitors in Berar, to the Resident for a consideration of the matter. We hope that our local authorities will give due weight to the matter and support the application. We know that the authorities here so far as their own Courts are concerned would not care to get any extension at all; that is to say they would have no personal concern in the matter. But as a matter of great importance to the public, we trust they will give to the subject the attention it deserves.

If two months cannot be allowed, six weeks are undoubtedly necessary and as to the question of putting back the Vacation from 15th to 1st May. there can possibly be no objection as the anomaly is so patent.

## THE AMRAOTI ELOCUTION GATHERING.

The Elocution Gathering commenced on night of 25th January. There were three subjects appointed by the Committee. The first was ' Education' as viewed by Spencer and Bain, and the defects of the present educational system in our schools. On this subject there were six candidates. The last from Bombay got the first prize of Rs forty. The second subject was ' The Indian Budget ' and remedies to curtail the expenditure of Government. One prize on the Subject was given to a Speaker from Amraoti. The third subject was the causes of dissensions amongst brothers. This was also given to a Speaker from Amraoti. The Gathering continued for four days.

## FROM OUR own CORRESPONDENT.

Mr. Roe on "the greatest event in the world's history.

On saturday evening the 26th ultimo Mr. Roe delivered an interesting lecture on the above mentioned subject in the Anglo Vernacular school. Different persons had different ideas about the meaning of the heading of the subject, though Mr. Fuller's coming convinced many as to what it meant; but the lecturer began in a singular way by asking questions as to what made the schools and offices closed on sundays; and why everyone under the British rule writes the date 1887, 88, 89, and so on at the beginning of any legal document or a letter; and what the date on coins current in India signify? By this and such other round about ways he introduced the audience to his favourite subject "Christianity." He drew the attention of the audience, often and often, specially to the Resurrection of Jesus; and on this one and only one ground, he vehemently and eloquently proved before the learned audience that Jesus was the son of God, that Jesus was incarnate god, that Jesus was an ambassador from God as the Saviour of mankind, and that Jesus shall accept no homage short of these Devine claims.

The lecturer observed, that Jesus in putting forth these devine claims must have been the son of the Lord or an impostor.

But he skilfully, by the foregoing *demonstrative* proof ( Jesu's Resurrection ) soon proved him to be what he claimed to be. While dwelling on this favourite point, he, twice or thrice threw the gauntlet of opposing him before the learned assembly, but none of them accepted his challenge. We don't know if the reason was that the lecturer proceeded on with his hobby, without giving them any time to speak; or was it through the determination of the audience not to discuss religious subjects, at least when the lecturer was a white man; or whether the audience was not prepared to speak that evening. Fortunately for the lecturer, he, while speaking with his scanty and singular arguments upon a subject equally affecting all and on which many of the audience could speak with perfectly sound arguments if they had but only attempted to speak, found none to oppose him. His vehemence was very great; his language was idiomatic, and his arguments were weak and scanty.

We are sure, if the lecturer would have been any one but from the west and particularly a Brahman ( as there had been once from Bramha Samaja ) he would have found many antagonists to oppose him; though, on the contrary, the lecturer would have abundent and reasonable proofs in favour of what he said and the antagonists trying to decry him, if not by any means at least by clamour. It was wonderful to observe that none of the thiests and athiests that opposed Mr. Kelkar, even unreasonably could open his mouth against the white lecturer; but all were alike shaking their grave and thoughtful hoary heads. Why could not they question the Resurrection of Jesus, when some of them even questioned the existence of God ( at the time of Mr. Kelkar's lecture )? Why could not they ask the lecturer when he said that Christ was the son of God in a particular sense and that he was His begotten son, that who begot him and what that particular sense was? Why could not they question him when he said he had found salvation in Jesus, that had Christ appeared to him and what he had said to him? Why could not they say, when he observed that a Mediator and a recommendation is required to see an earthly, mortal monarch only and that God is just and requires no one else between Himself and an individual wishing for salvation, the individual being His son and His doors open to all? Had none of them found salvation in Rama, Krishna or in some saints that are dead except in fame and powers of conferring benefactions on their devotees. Why could not they say to him that the presence of the mediator is quite necessary for, unless we see him how can he promise to stand as a mediator between us and the unseen God whose appearance, though splendidly handsome has capacity to inspire confidence ( अहो द्वीपि मतोऽपिविश्वसनीयतास्य राजो वपुषः ) and that why should they believe in him any more than in Shastries, Saints, and even in their own ancestors? Had they themselves read nothing of the incarnate Gods and seen nothing of the great saints with the infinitely greater and extraordinary exploits performed by these saints and Gods? We suppose that the poor audience was either undisposed to refute what an European lecturer gave out, or they were made quiet by his overwhelming vehemence and facinating eloquence.

A correspondent of the Central Provinces and Berar Times and Railway Gazette says, in its issue of 3rd January 1889, that Sanitation is very much neglected in Berar, attributing the negligence to Brahman Sanitary Inspectors, and recommends that European or Eurasian Inspectors be appointed to look after the health of the people.

The letter insinuates certain wrong ideas and is, thereby, misleading to the local authorities. The correspondent has not viewed the subject properly and therefore his recommendations are of little importance or use in practice. He alludes chiefly to Municipal towns in Berar. The sanitation of some of these towns may be, as it is of Akola, defective; but it must be seen what the defects are due to—whether to want of any things necessary or only to the negligence of the Brahman Inspectors. In Akola, for instance, the defective sanitation is due only to want of sufficient water supply and complete drainage. Otherwise, not only that the sanitation of the town is not neglected but it is as satisfactory as it can be with the means available; and this has been said by the Sanitary Commissioner, H. A. D., the highest and most competent officer to judge in Sanitary matters. The Municipality of this town has employed a Brahman Inspector and the Sanitary Commissioner has given him praise in his Annual Sanitary Reports for this Sanitary State of the town. This clearly shows that Brahmans can make very efficient Sanitary Inspectors and there is, therefore, no necessity for specially recommending Europeans or Eurasians for the places. They have rare or no opportunities of mixing among the natives, giving advice to ignorant people and of impressing on them the necessity for the observance of Sanitary rules in their own interests; and are consequently, compelled to resort, for every little thing, to coercive measures which result in general discontent rather than Sanitary improvement. The willingness of the people is stronger than a law to carry out any general improvement.

## वऱ्हाड.

हवामानः—अलिकडे पुन्हा थंडी थोडीशी पडूं लागली. प्रांतांत कित्येक ठिकाणीं देवींची साथ आली आहे.

मौलवी महंमद निजामुद्दीन अ. क. व येथील स्मॉलकॉज कोर्ट जज्ज यांची अमरावतीस बदली झाली. व त्या प्रमाणें ते गेल्या आठवड्यांत येथून गेले.

मि. सी. ए. डब्ल्यु. डेव्हिस आ. स्पेशल अ. क. हेच तूर्त स्मॉलकॉज कोर्ट जज्ज आहेत.

म. कमिशनर साहेब यांची स्वारी मागील आठवड्यांत येथून यवतमाळाकडे गेली.

गेल्या अगदीं थोडक्या दिवसांत आमच्या मुनसिपालिटीचें जें थोडेसें स्थित्यंतर झालेलें आमच्या कानीं येत आहे तें भूषणावह नाहीं. रुईबाजारांतील एका संभावीत व्यापाऱ्याचा तंटा; तत्संबंधांत कमेटीच्या मेंबरांचा झालेला अपमान; रुई बाजारा करितां कामिटी नेमण्या साठीं निरनिराळ्या ठिकाणीं झालेल्या सभा; व शेवटीं एका जुन्या, अनुभविक अत्युपयोगी मेंबराचा राजीनामा; या सर्व गोष्टींच्या संबधानें आम्हास पुरेशी माहिती नाहीं, तथापि योग्य अधिकारी यांची बारकाईनें चांगली चौकशी करतील अशी आम्ही उमेद बाळगतों.

## वर्तमानसार.

खेडेगांवच्या स्वच्छतेसंबंधानें पुष्कळ दिवस सरकारांत वाटावाट चालली असून आतां त्या बद्दल एक कायद्याचा मसुदा लवकरच पुढें येणार आहे. या बाबतींत ठिकठिकाणच्या म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांच्या मागें ही सरकारचें टुट्टें लागलें आहे यांतून त्यांचा कसा निभाव लागेल तो लागो. आमच्या लोकांनीं व कमिट्यांनीं याचा वेळींच विचार करावा.

अभिमान— आपल्या हद्दींतील कापूस इंग्रज सरकारच्या हद्दींत जाऊ नये ह्मणून ग्वाल्हेरीस खटपटी लोकांनीं एक गिरणी स्थापन केली आहे. व्यापाऱ्यांस असा कांहीं तरी अभिमान आल्या शिवाय देशांत व्यापाऱ्याचे मिषानें पैसा रहाणार नाहीं.

आफ्रिकेच्या कांहीं भागांत मीठ इतकें दुर्मिळ व महाग आहे कीं, तेथें एक मूठभर मीठ दिलें असतां एक गुलाम मोबदला मिळतो.

पक्ष्यांचा खेळ:— हरदयाळ मोतासन पंजाबवाले या नांवाचे कोणी मनुष्य बेळगांव येथें येऊन त्यांनीं मार्केटच्या नाक्यावर छोटासा तंबू देऊन खेळास सुरवात केली आहे. या खेळांत तबला, सारंगी पडदे, संगीत गाणे वगैरे. गोंधळ कांहींच नसून फक्त मनरंजनार्थ एक हार्मोनियम आहे. खेळाचीं मुख्य पात्रें कायती चिमणी, राघू, पारवा असे पक्षी आहेत. प्रथमतः चिमणी बारीक मणी दोऱ्यांत ओंवतें ते इतके जलद ओंवते कीं त्याजवर नजर सुद्धां ठरत नाहीं. तसेंच विहिरींतून पाणी ओढण्याचा, पुजेचा व आणखी कांहीं चमत्कारिक प्रकार करून दाखविते. त्याचप्रमाणें राघू हा पक्षी इतका कांहीं चाणाक्ष आहे कीं, कांहीं रुपयांतून खोटा रुपया ओळखून काढणें, तसेंच इंग्रजी, मराठी, गुजराथी, उर्दु या चारी भाषांत असलेले कार्डावरील अंक त्याचे पुढें टाकले असतां प्रेक्षक मागतील तो अंकाचा कार्ड त्यांतून बिनचूक शोधून आणून देणें, तसाच हा राघू सुमारें दोन हात उंचीच्या काठीवर बसतो, व दोन्हीकडे पेटलेल्या पलित्यांची काठी तोंडांत धरून फारच उत्तम रीतीनें सार्थी व पायाखालून वगैरे फिरवून मनुष्या प्रमाणें कसरत करून दाखवितो; शिवाय तोफ उडविण्याचें व खबूतरास बगीस जुंपून आपण (राघूनें) कोचमन होऊन बगी हाकणें वगैरे प्रकार पाहाण्या सारखे करून दाखवितो. वरील पात्रें जरी शुद्ध जंगली पक्षी आहेत, तरी त्यांस शिकवून तयार करण्याचें चातुर्य व पक्ष्यांचें शहाणपण या गोष्टी मनांत आणिल्या ह्मणजे प्रेक्षकांस मोठा अचंबा वाटतो. क० त०

या देशांत नेटिव्ह साठीं लष्करी पाठशाळा घालण्याचा सरकारचा विचार आहे. कमांडर इन चीफ सर फ्रेडरिक राबर्ट साहेबयांचें या सूचनेस अनुमोदन आहे.

पोस्टाचे टिकिटांना पुरेसा डींग नसतो अशी तकार सरकार पर्यंत जाऊन या पुढें पुरेसा डींग लावण्यांत येईल असें ठरलें आहे.

दिसेंबर अखेर पावेतों २,३३,७२,००० मण मीठ खपून त्यावरील जकाती पासून सरकारास ९,६७,००० रुपये उत्पन्न झालें.

अलहाबादचे पायोनियर वर्तमान पत्रांत विरुद्ध मजकूर आल्या वरून एके कप्तानानें त्या पत्राचे एडिटराचे पाठीवर चाबूक ओढले होते त्याबद्दल खटला चालून त्या कप्तानास १ महिन्याची सजा मिळाली व १२ महिने पावेतों चांगली वर्तणूक ठेवण्या बद्दल जामीन घेण्याचा हुकूम झाला आहे.

आम्हांस लिहिण्यास अत्यंत खेद वाटतो कीं श्रीमंत अण्णासाहेब विंचूकर यांस गेल्या च्या मागील गुरुवारीं देवाज्ञा झाली!

स्पेन देशाजवळ एक गलबत फुटून ठार झालें.

क. बल्कले नांवाच्या महू येथील एका मोठ्या लष्करी कामगारावर सरकारी पैशाची अफरातफर केल्याचा आरोप होऊन त्याची चौकशी कोर्ट मार्शल मार्फत झाली, व त्यांस एक वर्ष तुरुंगाची शिक्षा झाली, व त्यास पुण्यास तुरुंगांत ठेवण्यास आणला हो शिक्षा रद्द होण्या विषयीं आरोपी ड्यूक आफ केंब्रीज यांज कडे अपील करणार आहे असें समजतें.

नव्हरो प्रांतांत एक मिसेस जार्ज हिर्श नांवाची बाई आहे तिला एकाच वेळीं चार मुली आणि दोन मुलगे अशीं सहा मुलें झालीं. हीं सर्व हल्लीं सुखरूप आहेत.

मुंबईचे खेरीज करून बाकीची सर्व मिलिटरी पे हपीसें ता० १ एप्रिल पासून बंद होणार असल्याचें समजतें प्रत्येक डिस्ट्रिक्ट ट्रेझरींतून त्या त्या डिस्ट्रिक्टांतील लष्करी कामदारास पगार मिळणार.

पुढच्या महिन्यांत व्हाईसराय साहेब टुंगुमडाल रेल्वे सुरू करण्या करितां ब्रम्हदेशांत जाणार आहेत अशी बातमी आहे.

जमिनी गहाण ठेवणारी व्यापारी पेढी मद्रास, १० जानेवारी या पेढीचें तिसरें वर्ष संपलें. तिच्या हिशेबाचा खर्डा बाहेर आला आहे. त्यावरून असें कळतें कीं तिचे भांडवल ४,९०,००,००० रुपयांचें झालें आहे. राखून ठेविलें रकमेकडे वगैरे २,१३,००० रु० आहेत. गेल्या सहा माहीस निवळ नफा ९१२४९ रु० झाला. म्हणजे दरसाल शेंकडा २९ टक्के व्याज पडलें. न्या० सिं०

आनरेबल दादाभाई नवरोजी यांस लार्ड सालिसबरी ह्यांनीं 'काळा मनुष्य' ह्मटल्या बद्दल युरोप, अमेरिका, कान्डा, अस्ट्रेलिया, न्युझिलंड आफ्रिका इ० सर्व सुधारलेल्या खंडांतून व राष्ट्रांतून सुमारें सहासात हजार खेददर्शक मतें आलीं आहेत.

इंग्लंडांत फिन्सबरी येथील एका सभेंत मि० जॉन मोरले ह्मणाले कीं, दादाभाई नवरोजीस 'काळा मनुष्य' ह्मणणारा कोणी हलका सलका मनुष्य नव्हे आहे तो राज्यांतील मुख्य प्रधान आहे आणि त्यास इंग्रज लोकांच्या वतीनें अधिकार आहे. तेव्हां अशा हलक्या मनाच्या मनुष्यास एवढ्या मोठ्या जागेवर ठेवला आहे ही लंडनच्या लोकांची मोठी चूक आहे.

हैसूर संस्थानांत एक कागदांचा कारखाना स्थापन होणार आहे ह्याच्या जाहिराती लवकरच बाहेर पडतील. ह्या कारखान्यास संस्थानांतून कावेरी नदीच्या काठची एक जागा व पाणी फुकट मिळणार आहे व पांच वर्षें पर्यंत संस्थानास जितके कागद लागतील तितके कागद ह्या कारखान्यांतून घेण्याचा करार झाला आहे व वीस हजार रुपयांचे भाग संस्थान विकत घेणार आहे. स्वराज्य पाहिजे. ते ह्या करितांच!!

उत्तर हिंदुस्थानांत अव्हा गांवीं गोरक्षणी सभा भरली होती त्या सभेस सर्व जातीचे मिळून ४००० लोक जमले होते त्या सभेंत काशीचे एक मौलवी हाफीज महंमद नावाचे मुसलमान गृहस्थांनीं भाषण केलें कीं, हिंदुचे आणि मुसलमानाचे आतां बंधुत्वाचे नाते झालें आहे. अकबर बादशहानें हिंदुमुसलमान लोकांस सारख्या रीतीनें वागविलें ह्मणून च त्याचे राज्यसुखाचे झालें तेंच औरंगजेब हिंदुद्वेषामुळें घालवून बसला. गोवधापासून शेतकी नासत चालली देश भिकार होत चालला व व्यापाराला बराच धक्का बसतो इ० तोटे आम्हा मुसलमान लोकांस दिसत आहेत तर आह्मी गोवध करावा हे आमचें कर्तव्य कर्म आहे असें मुसलमान आमच्या इकडे किती आहेत!

युरोपांत थोडक्याच दिवसांत आजपर्यंत कधीच झालें नाहीं असें तुमल युद्ध लवकर च जुंपेल असें लार्ड वुल्सले यांचें ह्मणणें आहे. आणि वास्तविक पहातां असें होईल तरच याहूनही अधिक भयंकर अरिष्टें टळतील. शांततेसाठीं ह्मणून प्रत्येक राष्ट्रानें पुष्ट पुष्ट सैन्य पाळलीं आहेत. एकंदर खर्चापैकीं मोठी रकम सैन्याप्रित्यर्थ खर्च होत आहे आणि पुनः खर्चाचे मान दरवर्षीं वाढतेंच आहे. लोकांनीं तरी हा दाब किती दिवस सोसावा? एकदां चांगली लठ्ठालठ्ठी होऊन जेव्हां बाणासुराप्रमाणें कांहींच्या बाहूंची रग जिरेल तेव्हां यांचे डोळे उघडतील तोंडानें शांततेच्या नांवाचा जप केल्यानें शांततेची भक्ती दिसत नाहीं. एकानें सैन्य वाढविलें कीं दुसऱ्यास आपलें वाढविणें भागच. याचकारितां एका बाजूस तुटक पडलेल्या इंग्रज बहादुरांस देखील आपलें सैन्यबळ वाढविण्याचें जरूर वाटूं लागलें आहे. ही स्थिति नाहींशी होऊन स्वस्थतेचें साम्राज्य होण्यास एक प्रचंड युद्ध कीं सर्वत्र, ज्यांत गोवतील असें व्हावें हाच एक मार्ग दिसत आहे. लार्ड वुल्सले यांच्या मताप्रमाणें तें लवकर होईल असा सुमार दिसतो खरा.

ब्रह्मदेश व चीन यांचे सरहद्दीवर कांहीं भानगड सुरू आहे.

रशिया आपले सैन्यांत ऐंशी हजार लोक पाठवीत आहे.

बेलजियमचें सैन्य एक लक्ष तीस हजार आहे तें तीन लाख होणार.

जर्मनीनें जास्ती सैन्य ठेवण्या साठीं ९० कोटी रुपयांचें जास्त सांक्शन केलें आहे.

मद्रास येथें लेडी क्लिन नांवाच्या एका शिकारी बाईनें पांच वाघ मारिले

जपान व रशिया यामध्यें इंग्लंडचे विरुद्ध एक गुप्त तहनामा झाला आहे.

मुंबईस मि० पार्सिव्हाल स्पेन्सनर यांनीं विमानांतून १७६० फूट वर चालून तेथून एका २५ फूट घेराच्या छत्रीच्या आधारावर खालीं उडी टाकण्याचा अचाट प्रयोग करून दाखविला. प्रेक्षकांची खुपच गर्दी झाली होती. या धाडशी गृहस्थास यत्किंचित इजा झाली नाहीं. तेथून ते वरती उडाले तेथून जवळच ते जमिनीवर उतरले. एकंदर प्राप्ति सुमारें २५,००० रु० झाली असें ह्मणतात. के० रा०

## विक्रीस तयार.

कळविण्यांत येतें कीं बंगाल नागपूर रेलवे स्टेशन गोंदिया येथें ऐन व बिजाच्या चांगल्या सरळ व जुन्या अशा मयाली सुमारें २००० आहेत. लांबी बारा फुटापासून वीस फूट पर्यंत व चौरस एक फूट. दराची माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणाऱ्याकडे मिळेल.

आपाजी विनायक कॉनन्ट्राक्टर गोंदिया.

## दामोदर काशीनाथ काळे आणि कंपनी यांचा दवाखाना

या ठिकाणीं मनुष्यांचे व गुराचे सर्व रोगांवर औषधें मिळतात.

औषधें घेण्यास फार सुलभ आहेत. कोणत्याही रोगांवर वैद्य व अलोपाथिक डाक्तर जीं औषधें देतात त्याहून आमचे जवळ असलेल्या औषधांनीं फार लौकर चांगला व फार वेळ टिकणारा गुण येतो.

[illegible] रकरूज, [illegible], पू, [illegible] लहान मुलांचे आंग[illegible], अव[illegible] व इतर प्रकारचे [illegible] उत्तम गुण देणारी औषधें आह्मी आमचे दवाखान्यांत ठेविलीं आहेत.

[illegible] खाज, खसणें, नाठीला लागणें, पोट फुगणें, गळा सुजणें, आवरक्त, [illegible] रक्त येणें, [illegible], पोटांतील क्रमी, ज्वर व इतर सर्व रोग यांजवर या दवाखान्यांत औषधें ठेविलीं आहेत. गाई, बैल ह्मशी, हेले, घोडे, कुत्रीं, मांजरें, बकरीं, या जनावरांचे सर्व रोगांवर आह्मीं औषधें ठेविलीं आहेत.

या दवाखान्यात रोग्यांना औषधाबद्दल थोडी किंमत द्यावयास लागेल.

बाहेर गांवीं राहणार लोकांना आपआपले रोगाची हकिकत लिहुन कळविली असतां माफकदरानें त्यांस अभिप्राय मिळेल. औषधें मागविलीं असतां जीं औषधें आह्मीं पाठवूं त्यांजबरोबर औषध घेण्याचे माहितीचा कागद पाठवूं.

वर लिहिलेल्या कित्येक रोगांवरील औषधाचे एका कुपींत पांच मनुष्यांस पुरण्याइतकें औषध असतें.

जुने रोग व ज्या रोगांना बरें करण्यास वेळ लागतो अशा रोगांनीं पिडलेल्या लोकांस त्यांची मर्जी असेल तर ठराव करूं. ठरावाची जी रकम ठरेल त्यांपैकीं कांहीं आगाऊ द्यावी लागेल.

"हा दवाखाना उमरावती येथें भुसार दरवाज्या बाहेर मिस्टर प्रल्हाद नारायण जोग वकील यांचे वाड्यांत खालचे दिवाणखान्यांत आहे."

उमरावती मेडिकल हॉल.ता० २४-१०-८८

दामोदर काशिनाथ काळे आणि कंपनी.

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

माळभ. ॥ ७ ॥ ८८
किरकोळ अंकास.........................८४

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Six monthly............3 " 8 as.
Single copy ........................................4 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs-
per line over10... 4as.
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII — AKOLA MONDAY 11 FEBRUARY 1889 — NO.6.

वर्ष २३ — अकोला सोमवार तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १८८९ इ० — अंक ६

*K. B. Rele and caclousco smosteffi .*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहित अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालिली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांडुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वमावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतीमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वमें पडणें, हीं ह्यांच्या शेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. तर प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२परम्यावर खात्रीचें वस्ताद औषध.

हें निर्धोक अत्युतम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येतें. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

घट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखम्या बाय इ० मिटविणारे मलम कायतें हेच किं० ८ आणें.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतों, पडसें, दमा जातो, क्षयाचा,, डांग्या घशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हे रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हे कधींच मागें हटले नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटं मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांश:—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारीं असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी"

सुचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्यांकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना--आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तल मलम, साबू, पॉट्याश, टिंकचर्स, सल्याईन्स, इनोज, फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चश्मे, मुंबईत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत यतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्हाल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खाललि पत्त्यावर करावा.

पत्ता. के. बी. रेळें कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

"TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5. Old Court House Street, Calcutta.

बहिऱ्यांस

बहिरेपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद गुण आणणारें सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.

राजमाचीकर व साठ न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.
हिंदुस्थानचा करारचा आक्ट.
सन १८७२ चा ९ वा
अभिप्रायांच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यां सुद्धां
किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.

विक्रीस तयार.

कळविण्यांत येतें कीं बंगाल नागपूर रेलवे स्टेशन गोंदिया येथें ऐन व बिजाच्या चांगल्या सरळ व जुन्या अशा मयाली सुमारें २००० आहेत. लांबी बारा फुटापासून वीस फूट पर्यंत व चौरस एक फुट. दराची माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणाऱ्याकडे मिळेल.

आपाजी विनायक कॉनन्ट्राक्टर गोंदिया.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

चिखलदरा तारीख १–२–८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

कृतानेक सांष्टांग नमस्कार विनंती विशेष खालीं लिहिलेल्या चार ओळीस येत्या सुंदर अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

हें गांव अगदीं डोंगरांत असून येथें वस्ती ही फारच थोडी आहे. बहुतक सर्व मजुरी करून पोट भरणारे आहेत मारवाडी लोकांचीं घरें सरासरी चार पांच आहेत. येथील हवा फारच थंड आहे. महागाई फार आहे हवा वाईट असल्या मुळें नेहमी आजार उत्पन्न होतो. येथें सरकारी शाळा आहे स्कूल कमिटी नाहीं. माजी तहशिलदार साहेबांची शाळेस बरीच मदत होती. ते गेल्या पासुन कोणी ढुंकून पहात नाहीं. येथें मास्तरास पगार घेण्यास कचेरींत जावे लागत असें ह्मणून त्यांनीं वरिष्ठाकडे रिपोर्ट केल्या वरून ती वहिवाट बंद झाली परंतु ज्यांना बंद करण्या विषयीं हुकूम आला त्यांना फारच राग येऊन त्यांनीं मास्तरास धमकी दिली. असो. सत्त पुढें शहाणपण चालत नाहीं. शाळेंत बहुतक सर्व महाराचीं मुलें आहेत. तीं ही नियमीत शाळेंत येत नाहींत. येथें बदली झालीं ह्मणजे तीं मनुष्यें केवळ दुर्दैवीं समजावयाचीं. पोटासाठीं चाकरी करणें भाग आहे. कळाव लोभ असावा ही विनंति.

आपला एक
"क्ष."

वशीम ता० ६–२–८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

कृ० सा० न० वि० विशेष. आजरोजी येथें मास्तर लोकांची कान्फरन्स ( ह्या तालुक्यांतील शिक्षक समाज भरणार आहे ) त्या वेळीं आकोला येथें नुकत्याच बड्या समाजामध्यें झालेल्या गोष्टी नितीशिक्षणादी करून आपल्या ह्या वाशीम जिल्ह्यांत कितपत चालते व त्या प्रमाणें पुढे त्याची चांगल्या रीतीनें कितपत व्यवस्था ठेवतां येईल याचा विचार होणार आहे. याच वेळीं येथें एक संगीत नाटकामें साधलीं यांत त्यांनीं कृतकृत्य मानिलें पाहिजे. नाहींतर बिचाऱ्यांनां मुद्दाम नाटका करितांच येथें येण्यास कोठें सांपडत होते. पहिल्यानेंच बिचाऱ्यांनां पवित्र 'रंगी नायकीण प्रसहन पाहाण्यास सांपडल्यामुळें आज पर्यंत दुरून संगीत नाटकाचा प्रभाव ऐकूं येतां येतां शेवटीं प्रत्यक्ष पहण्यास सांपडल्या मुळें सर्व गात्रें प्रेक्षकांचीं संतृप्त झालीं असतील यांत संशय नाहीं. रंगी नायकीणीच्या प्रसहना सारखे खेळ जर वारंवार अवलोकन करण्यांत येतील तर नितीशिक्षणास फार भर पडेल व आतां जी कोठें कोठें उणिव दिसते ती नाहींशी होईल!! एकूण रंगाजीचा फार्स पाहून संगीताच्या लहरींत जणु सर्व रंगून गेलेले दिसले!! तारीख २३।१।८९ इसवी रोजीं "रामराज वियोग" हा संगीताचा प्रयोग करून दाखविला. पहिल्या अंकांत मंडळीच्या मनावर कांहींच चांगला ग्रह उत्पन्न झाला नाहीं. दुसऱ्या अंकापासून शेवट पर्यंत प्रेक्षणीय प्रयोग झाला. मंथरेनें व शंभूकानें ह्या दोन पात्रांनीं आपलीं कामें उत्तम रितानें केलीं. दशरथाचें पात्र बरें होतें परतु गायनांत वाकबगारी कमी असल्या मुळें त्या महत पात्रांत तेज जितकें पडावें तितकें पडलें नाहीं मंथ्यानें व दासिनीं आपलीं कामें बरीच केलीं ही मंडळी येथें चांगली लोकप्रीय झाली आहे. नाटकवाल्या मंडळीमध्यें जे दुर्गुण असतात ते यांच्या मध्यें दिसत नाहींत. नाटकवाली मंडळी असे जर नांव पडले आहे तर ही मंडळी नेहेमीच्या नियमाला बाधक समजली पाहिजे कित्येक विघ्नसंतोषी मंडळीच्या अनियमित इच्छे प्रमाणें ह्या नाटकार मंडळीनें आपली वागणूक ठेविली नव्हती सबब त्याच्या अपमानार्थानीं नाहीं जाहिराती ही गांवा मध्यें लोकांना लाविल्या वर्तमान पत्रांत त्यांच्या चांगूलपणा बद्दल question ही केला आहे मनुष्य नेहमीं आपल्या वर्तना प्रमाणें दुसऱ्याचें वर्तन चांगलें अगर वाईट पहातो त्या प्रमाणेंच येथील झालेला प्रकार पहातां आमच्या विद्वान नाटकार मंडळीस वाईट वाटण्याचें कारण नाहीं. त्यांनीं आपलें वर्तन चांगलें ठेवून उत्तम प्रकारें आपला धंदा करावा व त्यांत किर्ती मिळवावी पत्रकर्तेराव छापाचनी काय.

अपला एक
"क्ष"

मुक्काम वाशीम ता० ६
६-२-८९ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष ता० २७-१ ८९ इ० रोजीं रा० रा० यशवंत वामन दिघे वकील कोर्ट वाशीम यांचा स्वारी अलाहाबादेस राष्ट्रीय सभेकारितां या जिल्ह्याचे लोकांचे मुकत्यार ह्मणून गेला होता त्यांनीं राष्ट्रीय सभेचा महोत्सव स्वतः पाहिला व तेथें हिंदुस्थान देशाकरितां ज्या ले

क हिताच्या गोष्टी ठरल्या त्या त्यांनीं स्वतः पाहिल्या. या सर्व वाशिमस्थ लोकाना निवेदन करण्याकरितां सदरहू तारखेस सभा होऊन त्यांनीं त्या व्याख्यानरूपानें निवेदन केल्या. त्या ऐकून श्रोते अगदीं संतृप्त झाले. तेथें जाऊन पोंचल्यावर सभेच्या पुरस्कर्ते यांनीं आपला ( सर्वांचा ) किती सत्कार केला या बद्दल फार हकिकत सांगितली. तसेंच राष्ट्रीय सभे करितां जागा मिळण्यास पहिल्यापासून कोणते कोणते अडथळे आले त्यांचे वर्णन केलें. निरनिराळ्या प्रदेशांतून सभेकरितां आलेल्या लोकांची ह्या कामीं किती खटपट व दगदग होती हे सांगितलें. मंडपाचें वर्णन इतकें मनोहर केलें कीं जणु ते [illegible] होते असें [illegible] हुबेहुब पुढें उभे राहिलें. मनोरंजन इतकें मनुष्य अगदीं दंग होऊन जातो [illegible] सभेकरितां [illegible] मंडपाचें वर्णन [illegible] आहे. तेथें [illegible] तयार [illegible] मुद्दाम लोक जमले होते त्या पैकीं कोणाला कोणत्याही प्रकारची अडचण मुळींच न पडावी म्हणून तेथें तयार व्यवस्थापकांनीं ठेविलेली व्यवस्था याचें यथास्थित वर्णन केलें. सभे करितां सुमारें पांच हजार लोकांचा समुदाय जमला असतां यत्किंचित ही कोणाला अडचण न पडतां सर्व गोष्टी निर्विघ्नपणें पार पडल्या हें पुढील भाग्योदयाचें सुचिन्ह व दयाळु इंग्रज सरकारच्या राज्यांत जें लोकांना शिक्षण मिळत आहे त्यांचें दर्शक चिन्ह असा इतिहास सांगितला. सभेच्या कामीं सुरूवात झाल्यावर मुंबई इलाख्यांतून विद्वान् मुगुटमणी आनरेबल तेलंग व मेथा यांनीं आपल्या विद्येच्या योगानें सभेमध्यें तेज पाडलें व मोठे मोठे विद्वान् बाबू यांच्या बरोबरीनें मुंबई इलाख्याचे सभेमध्यें नांव राखिलें. ह्या सभेमध्यें विशेष संतोष मानण्या सारखी गोष्ट ही होती कीं ह्या वर्षी सभेचे प्रेसिडेंट युरोपियन होते. कित्येक साहेब लोक जरी सभे विरुद्ध आहेत तरी मोठ्या मनाचे जे युरोपियन आहेत त्यांना सभा आवडते. ते सभेचें व हिंदुचें हित इच्छितात. त्या हितचिंतकां पैकींच सभेचे अध्यक्ष होते. मि. ह्यूम तर सभेला आपला स्वतःचा जीवच समजतात. या उभय हितचिंतका शिवाय आणखीही सभेचें हित इच्छिणारे युरोपियन लोक तेथें पुष्कळ होते. शिवाय आनंद मानण्याची गोष्ट ही होती कीं जे सर सय्यद यांचे पक्षाचे व ह्या सभे विरुद्ध होते तेही सभेचें वैभव पाहून कित्येक तिकडे वळले. जेथें सभेकरितां जागा पसंत केली होती ती मुसलमानांचीच होती. या गोष्टीवरून सभेच्या विरुद्ध असलेल्या लोकांची संख्या फार नाहींच. सभेचें कामीं सुरुवात होऊन युरोपियन अध्यक्षाची योजना झाली तेव्हां सभासदांमध्यें आनंदाचा गजर एकसारखा चालला होता. पुढें अध्यक्षांचें भाषण झालें. नंतर ज्या गोष्टी सभेमध्यें करावयाच्या त्या संबंधानें काम सुरू होऊन तीन दिवस मतभेद न होतां ज्या गोष्टी करावयाच्या त्या सर्व ठरविल्या गेल्या. त्या गोष्टींची वर्तमानपत्रांतून चर्चा झालीच आहे. करितां येथें विस्तारानें त्या देत नाहीं. येणेप्रमाणें मिस्तर यशवंतराव यांनीं सभेचें वर्णन केलें. ह्या सभेकरितां गावांतील बरीच मंडळी जमली होती. व व्याख्यानकर्त्यांनीं सुरस भाषण करून सभासदांना आनंदविलें. त्याबद्दल त्यांचे फार आभार मानण्यांत आले. आमचे वकील साहेब सार्वजनिक हितांकरितां फार झटतात. या बद्दल आम्ही वाशिमस्थ लोक त्यांचे फार आभारी आहोंत. ईश्वर त्यांना चिरायु करो व आमचें हित करण्याविषयीची त्यांची बुद्धी कायम राखो.

या आठवड्यांत येथें अग्नीनारायणाचा बराच कोप झाला. मध्यें वारा इतका सुटला होता कीं रस्ते धुळीनें भरलेले असत. अशा प्रसंगीं दोन तीन दिवस एक सारखी आग लागत असे. कित्येक गरीब लोकांचीं घरें जळून जाऊन अगदीं निराश्रित झाले आहेत. गांवांत जी गवतांचीं घरें आहेत त्याज वरचें गवत काढून त्याच्या पेंढ्या बांधून घरावर ठेवाव्यात. असें केल्यानें आगीचा प्रसंग आलाच तर एकदम पेंढ्या खालीं पाडून घराचा बचाव करितां येतो. लोकांना ह्या गोष्टी समजत नसतील असें नाहीं. परंतु त्यांना कोणी तरी ह्या गोष्टी समजाऊन देण्यास लागत असतील तर गांवाला जवळ्यांचें ज्यांचें काम असेल त्यांनीं इकडे लक्ष द्यावें. म्हणजे घरें जळून गरीब लोक घराशिवाय निराश्रय होतात. ते होणार नाहींत तर बाह्मणांचें पुण्य घेण्याचें ज्यांचें कपाळी असेल त्यांनीं घ्यावें

गेला आठवडा मोठ्या दैवीचा मेला. संतर्पणाची तर रेलचेल झाली. बुंदीचे लाडू व साखरपुरी खाऊन तर ओकाऱ्या येऊं लागल्या. अशा संतर्पणानी देव तृप्त होतो, व भलें वर देतो हें खरें आहे. परंतु लोकांनां आळशीपणाच्या सवई लागतात स्त्रीपुरुषांचा मोठा समाज एकत्र जमतो यामुळ नीतींत कमीपणा होऊं पाहतो. कळावें हे विनंती.

आपला मित्र

" स "

वऱ्हाडसमाचार.

मिती माघ शुद्ध ११ शके १८१०

## लॉर्ड रे आणि लोक शिक्षण.

मुंबई युनिव्हर्सिटीचा वार्षिक समारंभ गेल्या महिन्यांत झाला त्या वेळीं गव्हरनर लार्ड रे यांनीं चान्सलर या नात्यानें भाषण केलें. लार्ड री यांनीं लोकशिक्षणाचा विषया संबंधानें इंग्लंडांत बरीच ख्याती मिळविलेली आहे व ते मुंबईचे गव्हरनर होऊन आल्या पासून त्यांच्या हातानें हा समारंभ अद्याप झाला नव्हता यामुळें त्या इलाख्यांत सध्यां लोक शिक्षण संबंधानें जी गडबड उडून गेली आहे व लोकांच्या मनांत सरकार संबंधानें जे संशय येत चालले आहेत त्यांबद्दल कांहीं तरी उलगडा त्यांच्या तोंडून होईल अशी सर्वांस आशा होती परंतु ही सर्व आशा व्यर्थ होऊन कांहीं मोहक वचना शिवाय बाहेर कांहीं आलें नाहीं.

तथापि अल्प दृष्टीनें पहातां लार्ड रे साहेबांच्या भाषणांत दुसऱ्या पुष्कळ गोष्टी वाखाणण्या सारख्या व बोधपर होत्या. उच्च प्रतीच्या शिक्षणाचें स्वरूप कसें असावें, आपल्या युनिव्हर्सिट्यांची रचना कशी असावी व त्यांनीं काय उद्योग करावेत या संबंधानें लार्ड री यांनीं सांगितलेल्या गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत नुसत्या पुष्कळ परीक्षा पास करून देणें हेंच युनिव्हरसिट्यांचें काम नाहीं. शिक्षणाची योग्यता त्या नुसत्या परीक्षावरच नाहीं. ज्याच्या योगानें सत्य व ज्ञान यांची प्राप्ती करून घेण्याची मनापसून उत्कंठा उत्पन्न होते, सतत अध्ययन व मनन करण्याची सवय ज्या पासून लागते त्यालाच खरें शिक्षण म्हणावें. अशा प्रकारचें शिक्षण देऊन लोकांच्या मनांतील अज्ञान मूलक जे ग्रह असतील ते काढून टाकावे व अनीतिकडे त्यांच्या मनाचा कल गेल्यास तो फिरवावा हे युनिव्हरसिट्यांचें कर्तव्य आहे. अशा प्रकारची योग्यता अद्याप आपल्या हिंदुस्थानांतील युनिव्हरसिट्यांस आली नाहीं व ही योग्यता अंगीं आणण्या करितां त्यांनीं आपलें स्वरूप यूरोपांतील प्रसिद्ध युनिव्हरसिट्यांच्या धरतीवर बदलें पाहिजे. आपल्या युनिव्हरसिट्यांचें पहिलें काम हें आहे कीं, त्यांनीं आपल्यांतील ज्या म्हणून कांहीं उत्तम उत्तम गोष्टी आहेत त्या कायम ठेवून आपल्या राष्ट्रास सध्यांच्या काळमाना प्रमाणें सुधारलेल्या इतर राष्ट्रांच्या बरोबरीनें चालता येण्या करितां त्या बरोबरीचे पाश्चिमात्य ज्ञानाचे या रीतीनें एकत्र समेलन होणें आपल्यास इष्ट आहे. दोन्ही प्रकारच्या ज्ञानांत ज्या ज्या उत्तम गोष्टी आहेत त्या आपल्यास साध्य करून घेतल्या पाहिजेत. हा हेतू सिद्धीस नेण्या करितां लार्ड री साहेबांनीं एक उपाय सुचविला आहे. तो हा कीं दोहों प्रदेशांतील उत्तम उत्तम विद्वान पंडितांनीं परस्पर दळणवळण ठेवून आपापले विचार एकमेकांस कळवावें. पाश्चिमेकडील लोकां पेक्षां सध्यां आम्हांस विशेष जरूर आहे करितां आम्ही आपल्या खर्चानें तिकडील विद्वान लोकांस इकडे बोलावून आणून त्यांची भाषणें ऐकावीत. आपल्या इकडील चांगल्या गोष्टींचें ज्ञान प्राप्त करून घेण्या करितां ते इकडे येत असतात तसें आपण ही तिकडे जावें. ही सूचना कांहीं वाईट नाहीं. परंतु खर्चाच्या मार्गानें पाहातां आमच्या लोकांच्या मनांत ही एकदम भरण्या सारखी नाहीं. तेव्हां इतके लांब जाण्याचे अगोदर आमच्या शाळांत व कालेजांत जे तिकडील विद्वान लोक येत असतात त्यांतच सुधारणा करून जितके उत्तम निवडून आणिता येतील तितके आणावे हें प्रथम बरें व सोपें दिसतें. लार्ड रे साहेबांचें लक्ष याच गोष्टी कडे प्रथम जाऊन प्रोफेसर वर्डस्वर्थ, अग्झन हाम या सारखीं रत्नें शिक्षकाच्या जागीं आणवतील तितकीं आणिलीं असतां हे कार्य भाग पुष्कळ अंशीं सिद्धीस जाणार आहे.

या शाळेंत शिक्षणक्रमांत शास्त्रीय विषयांचा भरणा अधिक करणें राजनीतिचें शिक्षण आम्हांस देण्या करितां युनिव्हरसिट्यांनीं हा विषय वैद्यकी, कायदे इत्यादी विषयाप्रमाणें स्वतंत्र रितीनें शिकविणें वगैरे अनेक गोष्टी लार्ड री साहेबांनीं सांगितल्या. एतद्देशीय भाषा युनिव्हरसिटीच्या वरील परिक्षें करितां घेण्या बद्दल त्यांचें अनुकूल मत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. लार्ड री साहेबांचें हें भाषण प्रत्येक शिक्षणहितेच्छु गृहस्थनीं वांचून विचार करण्या सारखे आहे.

( लिहून आलेला मजकूर )

आमचे नूतन रावसाहेब रा. रा. देवराव विनायक हे आपल्या व्हाईस प्रेसिडेंट शिपच्या जागेचा राजीनामा देणार अशी दाट वदंता उठली आहे. यांत कितपत तथ्य असेल ते असो. परंतु ईश्वर करून ही वदंता खोटी ठरो असें आम्ही मना पासून इच्छितों. राजीनामा देण्याचें वेड या वेळेसच आमचे रावसाहेबांचें डोक्यांत कोठून शिरलें! नुकत्याच केलेल्या तीर्थ यात्रेनें त्यांनां वैराग्य तर प्राप्त झालें नसेल ना? अथवा काळमाना प्रमाणें आलीकडील नूतन होतकरू मंडळीना पुढें करून त्यांचे शिरावर सार्वजनिक कामाचा बोजा सोपवून आपण भजनानानें स्तवन करीत काल क्रमणा करावी असें तर त्यांचे मनानें घेतलें नाहींनां; याचें खरें इंगित काय आहे कोण जाणें!!

आमचे रावसाहेबा सारखे हितकर्ते व्हाईस प्रेसिडेंट आम्हास पुढें मिळणें कठीण! प्रत्येक सामाजिक व राजकीय प्रकर्णात अध्वर्यु होण्यास त्यांना लहान मुलां प्रमाणें उत्साह वाटत असे. कांग्रेस संबंधानें आमचे रावसाहेबानीं किती दीर्घ खटपट केली हें सर्वांस विदीतच आहे. आज कांग्रेस संबंधानें वऱ्हाडचा दुसरा नंबर लागण्यास आमचे रावसाहेबच कारणीभूत होत असें निःसंदेह. होतकरू, मेहनती व लोकांची खरी कळकळ बाळगणारे गृहस्थ सार्वजनिक कामांतून आपले अंग काढून घेणार ही बातमी ऐकून कोणास वाईट वाटणार नाहीं! अंतःकरणांत प्रत्येकास वाटलेच पाहिजे. असो.

"गांव तेथें महार वाडा" या म्हणी प्रमाणें प्रत्येक मनुष्यास स्तुती करणार व निंदाकरणार लोक असणारच व ही जगाची रूढीच आहे तत्रापि मूर्खांनीं कुत्सित निंदकांकडे लक्ष न देता शांततेनें आपणास योग्य दिसेल त्या प्रमाणें काम करणें हेंच त्याचे कर्तव्य व भूषण होय.

कारण--॥नरपति हितकर्ता द्वेषतां याति लोके॥
॥जनपद हितकर्ता त्यज्यते पार्थिवेन्द्रैः॥
॥इति महति विरोधे वर्तमाने समाने॥
॥नृपति जनपदाना दुर्लभः कार्यकर्ता॥

लोकांस व राजास एकदम संतुष्ट करणें ही गोष्ट फारच दुरापास्त आहे. "प्रसूतीच्या वेदना वांझेस कोठून समजणार" त्या प्रमाणें या कमेटिचे सार्वजनिक कामांत कोणत्या प्रकारच्या अडचणी येतात व त्या किती युक्तीनें निवारण कराव्या लागतात याचा खरा अनुभव आमचे रावसाहेबच जाणोत. रिकाम टेकड्या लोकांना नांवें ठेवण्यास काय होतें? स्वतः एखादें काम बिन बोभाट करून दाखवावें व मग लोकांना नावें ठेवावीत, तर त्यांत कांहीं तरी चिज आहे नाहींतर व्यर्थ कुत्र्या प्रमाणें भुंकण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

आतां It is human to err या म्ह- णी प्रमाणें मनुष्याचे हांतुन आधिकाराचे जोरांत ऐखादे वेळीं चुकिनें क्वाचित अन्याय होण्याचा संभव आहे म्हणून तेवढ्या बद्दल त्यांचे सर्व कारकिर्दीस दोष देणें हा केवळ पाजीपणा होय कारण चुकणें हा मनुष्याच स्वाभाविकच धर्म आहे.

रावसाहेब देवराव विनायक यांनीं आज पर्यंत मोठ्या नेटानें व एक दिलानें आपलें कर्तव्य उत्तम रितीनें बजाविलें या बद्दल सर्व मंडळीनीं त्यांचे आभार मानून त्यांनीं घेतलेल्या श्रमाची उतराई करावी अशी आमची इच्छा आहे. यांचे कारकिर्दीत लोकांनां किती सुख झालें व गांवांत किती सुधारणा झाल्या त्या सर्वांस विदीतच आहेत.

मनुष्य जवळ असतां त्याची किंमत समजत नाहीं त्या प्रमाणें आमचे रावसाहेब कांहीं दि[illegible] न आपलें काम पहात नाहींत तर कमेटींत [illegible] ती भानगड होतात हे ही सर्वांस विदित आहे. सार्वजनिक कामाचें जूं सरकारी अधिकाऱ्यांचें हातीं देणें बरोबर नाहीं. कारण सरकारास संतुष्ट करण्या करतां त्याचे हातुन कदाचित अन्याय होण्याचा संभव आहे. व स्वतंत्र मनुष्य जसा आपले हक्काबद्दल लोकां तर्फे सरकाराशीं भांडेल तसा सरकारी अधिकारी भांडण्याचा भाव आणील तर त्याचे दोहो पर्ली नुकसान होईल. करतां आमची सरकारास एवढीच सुचना आहे कीं, त्यांनीं रा. ब. देवराव बाबा यांचा राजीनामा मुळींच मंजूर करूं नये व फारच आग्रहानें केल्यास त्याचे जागेवर त्यांचेच तोडीचे गृहस्थ ज्यांनीं नुकताच आपले सेक्रेटरीचे व मेंबरशिपच्या जागेचा राजीनामा दिला त्यांची नेमणूक करावी. या गृहस्थाचा राजीनामा सरकारनें कबूल तरी कसा केला! असे विद्वान् होतकरू, व निस्पृही लोक जाऊं लागले व सरकारही त्याच जाण्यास अनुमोदन देऊं लागलें तर आमचे पुढें कसें होइल!

---

## The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 11, 1889.

---

### THE SYSTEM OF JUDGESHIPS IN BERAR.

Now that the new High Court scheme is shortly to come into force in Berar, it may not be amiss to examine the system of Judgeships in Berar. The system here up to date has been, at any rate to all outward appearances, one of favoritism and influence. Persons of no proved merit or acknowledged ability are often put in as Extra Assistant Commissioners and Assistant Commissioners. In fact the degree of influence one may have with the Resident or with the Foreign office at Calcutta determines ones grade in the commission as an Assistant or Extra Assistant Commissioner. If amongst men of equal ability a preference were shewn on the score of some particular merit for holding office, that would be something capable of a reasonable interpretation. But when you see persons shoved on into the commission— persons who ostensibly have nothing to recommend them for the posts to which they are appointed, those outside the official ring cannot be blamed if they attribute the appointments to influence and favouritism. If we exclude such of our Extra Assistants as have risen, through the lower grades of service by sheer dint of labor, it will be found that the remainder of the rank and file of Extra Assistants is made up of recruits of the above stamp. Now when it is considered what an amount of responsibility lies in the proper discharge of functions by an Extra Assistant even at the very commencement of office, it will be at once clear that the present system is not only defective but actually pernicious. An Extra Assistant has to be a magistrate exercising at least third class powers and a civil Judge exercising at least powers up to 50 Rupees worth civil suits, and perchance has to enquire into revenue cases as are given to him by the Deputy Commissioner. Young gentlemen who have had no legal training whatsoever are at once put into office as Extra Assistants and the result is, of course miscarriage of justice. Of course there are appeals against wrong or illegal decisions, but it is not at all safe to rely on those remedies for they are admittedly so tardy and troublesome to such as can seek them.

But miscarriage of justice is only a very minor evil when the other results of the system are looked to. In a system of influence and favoritism, there is never any place for good people persons of superior education or such as have acquired particular legal training. If they get into service at all, they have to no advantages and having no encouragement of any kind, have to leave it in disgust. Thus eventually the whole service becomes demoralized and you can never induce good persons to enter into service.

Another very great evil of appointing persons to judgeships for which they are not qualified, is to lower them in the estimation of the Bar and the public in general. When the Bar is a progressive Bar, as is undoubtedly the case in Berar, it is absurd to suppose that the Bench can maintain its hold on the Bar or the suitors. The Bench and the Bar are the necessary adjuncts of each other and ought to serve as wholesome correctives. But if the gentlemen on the Bench cannot hold their own against the Bar, they can never exercise any wholesome influence on the latter and what are intended as helps to each other must necessarily be clogs. For this reason, which is also a very important one, it is extremely desirable that well qualified persons should be appointed to the posts.

But it is said, and said in Berar, we believe by many who have successively held the highest Judicial office in the province that law is more common sense and cases decided by the chartered High Courts are but Common sense embodied in a tangible form. We must own, that this is not our idea of law at all. Common sense is a very good term to use; but if that were the only criterion in the decision of cases, Law would never have been such a complisated Science as it has now become. It is not mere common sense that will help one in deciding cases b[illegible] highly educated legal sense. The government of this country know better and do not pay thousands and thousands to persons on the High Court Bench for the simple qualification that these latter possess common sense duly methodized. We repeat that Law is not a mere common sense business but that a highly educated legal sense is necessary to become a good lawyer and Judge. If this were the correct view, then it is very desirable that even in the Non-regulation provinces, some system of securing and appointing better Judges than now, ought to be adopted.

---

The Commissioner having desired to see the discussion in the Committee a General meeting of the local municipality was held in the Town Hall on the 31st January 1889. Besides the Commissioner and the Deputy Commissioner who occupied the chair, eleven municipal members were present in the metting. Among other subjects the Committee had to consider and decide whether the salaries of officers in England (when on leave or furlough) are liable for Town Fund assessment. So far as the words used in the law run we see no reason why the salaries should be exempted? The officers in England either on leave or furlough though not personally working for gains within municipal limits are still indirectly working by a substitute for gains. After a little discussion on the subject between the Commissioner, the Deputy Commissioner and Raosaheb D. V. the point was voted against by 7 members including all officials and some nonofficials. Raosaheb D. V. wisely proposed that this question should be reffered to the Commissioner and the Resident for explanation whether the word "or working for gains" used in the Law do not include the said officers. But some members being too anxious to vote against the point carried it by a majority of 2 before he could conclude. So the proposal of reference was lost by a minority of 2. Side by side with this arises a question whether other Government servants not going to England are liable to be assessed for the salaries they get while on leave and absent from Municipal limits. And the answer would certainly be in the negative. The same principle which exempts the officers in England from assessment would certainly speak in their favour. And with fair and even-handed justice they would be right if they ask for exemption.

We regret to hear taht Maulvi Nizamuddin B. A. B. L- having got a good appointment in Agineer, left this province for good. In him we loose one of the best and impartial member of the Bench.

### HYDERABAD RESIDENCY ORDERS, FEBRUARY 1 1889.

Mr. R. H. C. Whittall, Officiating Conservator, 3rd grade, Berar---to be Officating Conservator 3rd grade, Punjab.

---

Mr. E. P. Dansey, Officiating Deputy Coservator, 3rd grade, North-western Provinces and Oudh, and Assistant Inspector General of Forests and Superintendent of Working plans---to be Officiating Conservator, 3rd grade Berar.

---

Mr. Sheikh Hyder, retired Court Inspector, Akola, is appointed a Member of the Akola Municipal Committee, vice Mr. Dattatraya Vishnu Bhagvat, resigned.

---

Colonel H. C. A. Szczepanski, Deputy Commissioner, 1st Class, Buldana, has been granted privilege leave for 15 days with effect from the [illegible] January 1889, or from such subsequent date has he may avail himself of it.

---

Mr. Krishnaji Daryaji is transfered from Malkapur, Buldana Dristict, to Ellichpur, Ellichpur District.

---

Mr. Hari Vishwanath, is transfered from Fllichpur Ellichpur District, to Malkapur, Buldana District.

---

चुकांची दुरुस्ती:—पहिल्या पानावरील ति सऱ्या कालमांतील शेवटच्या दोन ओळी खालीं लिहिलेल्या प्रमाणें वाचून नंतर चौथा कालम वाचावा.

क आलें आहे त्यांचें चरित्र ही मास्तर लोकांस पहाण्यास सांपडेल. एका कामांत दोन

---

## वऱ्हाड

यात्रा बंद केली—भिलटेकास मोठी जंगी यात्रा जमली होती. पण मोठ्या दुर्दैवाची गोष्ट समजली पाहिजे कीं, तेथें महामारीचा उपद्रव उद्भवल्यामुळें सरकारास ती यात्रा बंद करणें भाग पडलें. यात्रेस न जाण्याबद्दल दवंडी झाली आहे.

कर्नल बुलक साहेब डे. क. येत्या एप्रिल महिन्यापासून १९ महिन्याचे रजेवर विलायतेस जाणार असें ह्मणतात.

खून—बडनेरास एका कसबिणाचें वर्ग कांहीं लोकांनीं एका औरतेचे गळ्यास दोरीचा फांस लावून तिला ठार मारून तिचे दागिने उपटले. पोलिसांनीं मुद्देमालासह चार इसम पकडले असून रा० रा० गणेशरावजी खापर्डे ए० अ० क० यांचे समोर या मुकदम्याची चोकशी चालू आहे.

मि. काटगन्ह डि. सु. पोलीस वर्ग तीन यांस ता० १३ माहे नोवेंबर सन १८८८ इ. पासून वर्ग चारचे डि. सु. पोलीस केले व मि. हीय यांस वर्ग तीनचे डि. सु. पोलीस केले.

कर्नल मेकंझी सा० जु० कमिशनर झाल्यामुळें ता० १० माहे नोवेंबर सन १८८८ पासून खालीं लिहिल्या प्रमाणें वर्गावर्गी झाली आहे.

कर्नल बुलक सा० सेकंड क्लास डे० कमिशनर झाले. मि. निकोलिट अ. क. हे [illegible] क्ला. डे. क. झाले. मि. डनलाप अ. क. से क्ला. हे फर्स्ट क्लास. अ. क. झाले. मि० ह[illegible] अर अ. क. से. क्ला. हे. फ. क्ला. अ. क. झाले क्या. मारिस अ. क. से. क्ला. व आ[illegible] फिसिएटींग डे. क. थ. क्ला. हे कायमचे फ. क्ला. अ. क. झाले. असून हर्डी [illegible] आ[illegible] थ क्ला. डे. क. चें काम पहातील. महम[illegible] याशीनखान अ. क. थ. क्ला. हे से. क्ला. अ. क. झाले. पंडित सुरज नारायण स. अ. क. थ. क्ला. हे थ. अ. क. झाले.

रा. सा. देवराव विनायक यांनीं येथील म्युनिसिपालिटीच्या व्हाईस प्रेसिडेंट जाग्याचा राजीनामा दिला कारण समजले नाहीं.

---

## वर्तमानसार.

डेक्कन कॉलेजचे प्रिंसिपाल मि. आर. [illegible] आक्सथाम हे नऊ महिन्याच्या फर्लोवर [illegible] ह्या गुरुवारीं विलायतेस गेले आहेत. ह[illegible] आफिशिएटींग प्रिंसिपाल मि. एफ. जी. [illegible] ल्वी हे आहेत.

खेडा जिल्ह्यांतील लेवाकुळबी लोक[illegible] आपल्या [illegible] कार्यांत कसा खर्च करा[illegible] हुंडा किती घ्यावा, किती द्यावा वगैरे [illegible] मुंबई सरकारनें कांहीं ठराव गेल्या सरक[illegible] ग्य [illegible]टात प्रसिद्ध केले आहेत

हिंदुस्थानचे खरे हितचिंतक मे० केन साहेब हे गेल्या शुक्रवारीं विलायतच्या आगबोटीनें स्वदेशीं परत गेले. पुणें शहरीं साहेबांनीं हिंदुस्थानांतील सफरीचा दोन अडीच महिन्यांचा अनुभव सांगितला त्यावरून त्यांस आमची खरी बाजू कळून आली आहे असें दिसते. साहेब 'मद्यपान निषेध' सर्वत्र पसरण्या साठीं अहर्निश झटत आहेत. पार्लमेंट मध्यें मि० केन साहेब आह्मास पाठीराखे आणि पुरस्कर्ते मिळाले आहेत. हें मोठें आपलें भाग्यच समजलें पाहिजे.

लंकेतुन अलीकडे इंग्लंडास चहा फार जातो. गेल्यावर्षीं दोन कोटी तीस लक्ष पौंड गेला. बरोबर पंधरा वर्षांचे पूर्वीं पंधरा पौंड गेला होता.

टक्कल पडलें असतां राकेल तेल फाशींत जावें ह्मणजे केस येतात. असें एका इंग्लिश पत्रांत लिहिलें आहे.

दक्षिण हैद्राबाद येथें एक वर्षाची मुलगी आणली आहे तिला दोन्ही हात व उजवा पाय नाहीं. पण ती अजून जिवंत आहे.

क्यापटन हियर्स यांस पायोनियर पत्रकर्त्यांस मारल्याबद्दल झालेली शिक्षा अपिलांत कायम झाली.

ब्रह्मदेशांकडुन भीतिकारक वर्तमानें येत आहेत. कराची येथें माहामारीचा उपद्रव जारीनें सुरू आहे.

पासिफिक महासागराचे कांठावरून एक जमिनीवर चालणारा मासा पकडुन आणला आहे.

अमेरिकेंतील स्वतंत्रसंस्थानांचे सरकारानें एक प्रचंड दुर्बीण विकत घेतली तिची किंमत बावीस लक्ष पन्नास हजार रुपये आहे.

सरलिपेल ग्रिफिन सारख्या पुरुषांस हिंदुस्थान अंतरलें ह्मणून पायोनियर कर्ता अश्रु ढाळीत आहे.

प्रसिद्ध डार्विन यांचे चिरंजीव हेही मोठे तत्वज्ञानी आहेत. त्यांना अलीकडे असा शोध लागला आहे कीं चुलत भावंडांत शरीर संबंध होण्यास वैद्यशास्त्र दृष्टीनें कांहीं हरकत नाहीं.

हिंदुस्थानांत सर्पांच्या दोनशेतेरा जाती आहेत, त्यांपैकीं फक्त तेहतीस विषारी आहेत. दरवाज्यापुढें कारबानोक ॲसिडची पूड रांगोळी सारखी घालून टेविली असतां सर्प आंत शिरणार नाहीं असा एकानें शोध लाविला आहे.

सर्व हिंदुस्थानभर म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेची एक ठरीव व उपयुक्त व्यवस्था करावी असा सरकारचा ठराव वाढत आहे.

के०

सयामचे राजे काशीयात्रे साठीं निघाले आहेत. ब्रह्मदेशाचे टाकाला हा सयाम बौध्य धर्मी प्रांत आहे.

ह्यूम साहेब व केन साहेब या उभयतांना या देशांतुन सरकारानें हाकुन द्यावें व त्याजवर राजद्रोहाचा आरोप ठेऊन खटला चालवावा असें उत्तर हिंदुस्थानांतील इंग्रजी वर्तमानपत्रें सरकारास शिफारस करितात. जगांत या देशासारखा हतभागी देश कोणताच नाहीं कीं ज्यांत प्रजेचे कल्याणाची खटपट राजद्रोहास कारण होते.

हल्लींचे व्हाईसराय साहेबांचा मुसलमानाकडे विशेष कल दिसतो. कलकत्याकडे कलेक्टर आफिसांत २० नवीन जागा झाल्या होत्या त्यांत ११ मुसलमान व ९ बाबु नेमावे म्हणून त्यांनीं हुकूम दिला.

झोंप जर आपल्यास येत नसली तर पूर्वीं जे आपल्यास एखादें स्वप्न पडलें असेल त्याचें स्मरण करावें. ह्मणजे झोंप येते असें एका फ्रेंच डाक्टराचे मत आहे.

यापुढें माट्रिक्युलेशन परीक्षेची तोंडी परीक्षा बंद करण्यांत आली आहे. हा उमेदवारांच्या मागचा मोठाच त्रास वाचला ह्मणावयाचा. न्या० सिं०

इंग्लंडांत राहणाऱ्या कित्येक मुसलमानांनीं सभा करून आपण राष्ट्रीय सभेस अनुकूल आहोंत असा ठराव केला.

केरोसीन तेल व कापूर ह्यांच्या मिश्रणापासून त्वचेचे रोग व गुढवें व सांधे दुखणें बरें होतें असें एकजण ह्मणतो.

एका अमेरिकन विद्वानानें तारायंत्रांतुन चित्रें पाठविण्याची युक्ति काढिली आहे.

मि० एडिसन हे आपल्या फोटोग्राफानें एक प्रत्याहिक वर्तमानपत्र काढणार आहेत. तें वाचावयास मुळींच नको. पत्र आलें ह्मणजे कोणीही ते आपल्या फोनोग्राफांत घालावें आणि फोनोग्राफ चालू करून त्याची नळी कानास लावून दररोजचे वर्तमानपत्र ऐकत बसावें न्या० सु०

या महिन्याच्या १९ व्या तारखेस कलकत्यास जाण्या करितां हैद्राबादेचे प्रधान व त्यांचे मंडळ हैद्राबादेहून निघतील.

ह्मैसुरांत जो लवकरच खेडा (?) नांवाचा खेळ होणार आहे त्या करितां तेथील महाराजांनीं १२ हत्ती विकत घेतले आहेत.

सयामांतील कांहीं राजपुत्र बनारस येथें येणार आहेत.

'इव्हानिंग न्यूज' नांवाचें वर्तमानपत्र सदार दिलीरजंग यांच्यावर १००० रुपयांची दिवाणीत फिर्याद करणार आहे. कारण समजलें नाहीं.

वयाच्या भरांत आस्त्रियाच्या युवराजानें आत्महत्या करून घेतली असें व्हिएना येथें त्या सरकारानें प्रसिद्ध केलें आहे. ठा.व.

स्त्रीवेषधारी पठाण—एक पठाण स्त्री वेष धारण करून रेल्वेनें प्रवास करित असतांना, लाहोर स्टेशनावर रेल्वे पोलिसानें त्याला पकडलें. तपासाअंती त्याच्या जवळ २६ मोहरा, १९ रु० व कांहीं दागिने सांपडले. स्त्रीवेष घेण्याचें कारण त्यानें इतकेंच सांगितलें कीं माझ्या बायकोला कोणी पळवून नेली आहे. ९ वर्षें झालीं तिला शोधण्या करितां मी माकडाचा तमाशा घेऊन हिंडलों, व दुसरे पुष्कळ उपाय केले पण तिचा पत्ता लागत नाहीं. ह्मणून शेवटीं बायकांचे जनानखान्यांतुनही हिंडतां यावें ह्मणून हा वेष धारण केला आहे.

चिनी लोकांच्या विचित्र समजुती जंगली व कांहींसे सुधारलेले चिनी लोकांस एखाद्या अवयवाची वाढ कांपणें आवडत नाहीं. बहुतेक सुधारलेल्या चिनी लोकांत ही चाल आहे. एखादें संकट आलें असतां ते मोठ्या धैर्यानें निवारण करितात. दुःखाची ते पर्वा करीत नाहींत. दुखण्या मध्यें कोणताही अवयव कांपणें त्यांस आवडत नाहीं. मृत झाल्यावर शव तसेंच पेटींत घालून जाळतात एखाद्या वेळेस ते आपलाच अवयव पोटांत ठेवण्याचे हेतूनें तोडून खातात. दांत पडला असतां तो टाकून न देतां तसाच गिळतात, किंवा त्याची भुकी करून पाण्यांत घालून पितात. दुसरी एक या लोकांत अशी समजूत आहे कीं, आई किंवा बाप आजारी असतां त्यानें आपल्या मुलाचें सगळें मास खाल्लें असतां त्यांस आरोग्य येतें. या बद्दल त्यांचा असा समज आहे कीं आई बापाच्या शक्ती पासूनच मुलांची उत्पत्ति झालेली असते; तेव्हां ती शक्ति जर पुन्हा शरिरांत गेली तर आई बाप पुन्हा सशक्त होतात.

ते० मि०

---

# जाहिरात.

## डा. नारायण चिंतामण यांनीं मुद्दाम तयार केलेलीं उत्तम गुणकारी औषधें.

**सूचना**—हीं सर्व औषधें शुद्ध वनस्पतीचीं केलेलीं असुन हजारो लोकांनीं अनुभवलेलीं आहेत. रक्तांत दोष उत्पन्न करणारे रसायनांचा ह्यांत बिलकुल उपयोग केलेला नाहीं. जाहिरांतीतील औषधांवर लोकांची श्रद्धा बसत नाहीं म्हणून रोग्यांना ह्या सर्व औषधांची गरज पडेल तेव्हां निदान एकवेळ तरी मुद्दाम उपयोग करून पाहवा अशी त्यास माझी सविनय प्रार्थना आहे ह्या सर्व औषधांचा उपयोग शेंकडों रोग्यांनीं करून पाहिला व त्यां पैकी तीन चतुर्थांश बरे होतात अशी आमची खात्री झाल्या मुळें तीं प्रसिद्ध केलीं आहेत.

### गजकर्णावर रामबाण औषध.

ह्याची तर सर्वत्र प्रसिद्धीच आहे. याचे गुणा बद्दल मिळालेल्या सर्टिफिकिटां पैकीं कांहीं माहितीचे कागदांत दिलीं आहेत. किं. दर बाटली ०९ आ. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

### खरजेवर हटकून गुणकारी मलम

हें लावलें असतां मुळींच झोंबत नाहीं. तीन चार दिवसांत खरूज बरी होते. याचे ही गुणाबद्दल सर्टिफिकिटें आहेत. किं. दर डबी ०८ आ. बंगी करणावळ ०१ आणा. शिवाय टपाल खर्च.

### खात्रीचे नेत्रांजन.

आलेले डोळे, लाली, खुपऱ्या, डोळ्यांतून पाणी येणें, डोळे खुपणें व सारा वगैरे सारखे विकार चार दिवसांत बरे होतात. किं. दर बाटली ०७ आ. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

### मूळव्याधीवर अद्भुत सर्बत

अवश्य अनुभव घ्या रोग नवीन असल्यास एक बाटलींत काम होतें. रक्त पडणें, आंग सुज व ठणका, हीं तीन चार दिवसांत कमी होऊं लागतात. किं. दर बाटलीस रु. ३०४ बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपालखर्च. १ बाटली १२ दिवस पुरते.

मोड असल्यास हें सर्बत घेऊन शिवाय मलम घ्यावें लागतें. किं. दर डबी. ०८ आ. बंगी करणावळ ०१ शिवाय टपाल खर्च.

### आंवरक्ताच्या हगवणीवर गोळ्या.

सुमारें आठ दिवसांत मुरडा, आंवरक्त अगदीं बंद होऊन अन्न पचन होऊं लागतें. रोग अगदीं नाहींसा होतो. किं. दरएक २४ गोळ्यांचे डबीस १ रु. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

### शीत ज्वर व हिंवावर गोळ्या.

ह्या गोळ्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच. यांचे सेवनानें कितीही दिवसांचे अगर कितीही दिवसांनीं येणारे हींव असो सुमारें चार दिवसांत हटकून बंद होतें. हिंवावर तर ह्या गोळ्यांची क्रिया केवळ जादू सारखी होते. किं. दर १६ गोळ्यांचे डबीस १ रु० बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

### परम्यावर उत्तम पाक

हा पाक तीन दिवस घेतला असतां लघवीची आग व तिडक नाहींशी होऊन पू वाहणें बंद होऊं लागतो. रोग नवीन असल्यास एक बाटली पुरे आहे. नाना तऱ्हेची रसायनी औषधें खाऊन ज्याचा परमा फार विकोपास गेला असेल त्याला दोन बाटल्या घ्याव्या लागतील. किं. दर बाटली ३ रु० बंगी करणावळ ०९ आ. शिवाय टपाल खर्च.

### स्त्रियांच्या धुपणीवर कषाय (काढा)

धुपणी तांबडी अगर पांढरी असो हा कषाय घेतल्या पासून सुमारें चौथे दिवशीं गूण दिसूं लागतो. गरोदरपणीं सुद्धां हा काढा देण्यास योग्य आहे. [illegible] २०४ रु० बंगी करणावळ [illegible] य टपाल खर्च १ बाटली [illegible]

फारच उत्तम सालंमिश्री [illegible]

स्त्री पुरुषांस सारखा गु[illegible] वनानें अग्निमांद्य, जीर्णज्वर, [illegible] शक्तता, मेंदूची क्षीणता, हा[illegible] दुखणें, व सुस्ती वगैरे सा[illegible] नाहींसे होऊन कांती वाढ[illegible] होऊन सर्व इंद्रियें बळकट [illegible] हिंवाळ्यांत घेण्यास फारच [illegible] स्त्रियांना बाळंत होऊन दो[illegible] वर हा पाक अवश्य खावा. कि. दर शेर ३०४ रु० बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपाल खर्च.

### खोकल्यावर गोळ्या.

खोकला उष्णते पासून उद्भवलेला असो किंवा थंडी पासून असो ह्या गोळ्या घेतल्या पासून दुसरेच दिवशीं गुण दिसूं लागतो, कास श्वास दमा वगैरे सर्व विकार ह्या गोळ्यांनीं हटकून नाहींसे होतात. डांग्या खोकला व क्षयाच्या खोकल्यावर ह्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. किं. दर २४ गोळ्यांचे डबीस १ रु० बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

हीं सर्व व आणखी सर्व रोगांवरील औषधें प्रांत वऱ्हाड, आकोलें येथें आमचे दवाखान्यांत विकत मिळतील. व्हीं. पेबलनें ही पाठवूं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं पत्ता सुवाच्य लिहावा. ह्या सर्व औषधांचे अनुपानांचे कागद औषधां बरोबर मिळतील कळावें.

नारायण चिंतामण

डाक्तर.

---

हे पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास...................४

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०१

Single copy ............................4 as.

Advertisements
Below 10 lines...1Re
per line over10... 1as
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII — AKOLA MONDAY 18 FEBRUARY 1889 — NO.7

वर्ष २३ — अकोला सोमवार तारीख १८ माहे फेब्रुवारी सन १८८९ इ० — अंक ७

*K. B. Rele and caclousco smosteffi.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था. मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्त्रीमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. हे प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचे वस्ताद औषध.

हें बिनचोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

घट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाय इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणे.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा जातो, क्षयाचा,, डांग्या धशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हे रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियन नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यात हे कधींच मागें हटले नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिली. तीं फार गुणकारीं असून निर्दोष आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी"

सुचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबु, पोम्याश, टिंकचर्स, सलाईन्स, इनोज, फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येताल त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी. रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

" TO THE DEAF. "

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

बहिऱ्यांस'

बाहिरेपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद गुण आणणारे सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.
हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.
सन १८७२ चा ९ वा
सम्मतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यां सुद्धां
किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.

## स्लिपर्स तयार.

कळविण्यांत येतें कीं बंगाल नागपूर रेलवे स्टेशन गोंदिया येथें ऐन व बिजाच्या चांगल्या सरळ व जुन्या अशा मयाली सुमारें २००० आहेत. लांबी बारा फुटापासून वीस फूट पर्यंत व चौरस एक फूट. दराची माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणाऱ्याकडे मिळेल.

आपाजी विनायक कॉनन्ट्राक्टर गोंदिया.

नोटीस.

माताबाई, नारायणगीर, रावेगीर गुरु बुधगीर, या त्रिवर्गास खालीं सही करणार यांजकडून असें कळविलें जातें कीं तुह्मी रावेगीर यांचें दुसरें लग्न करणार आहा असें ऐकितो. तर आपण माझ्या मुलीच्या अन्नवस्त्राची वगैरे काय ती योग्य तजवीज करावी. असें न केल्यास व आपण जर रावेगीर याचें दुसरें लग्न केल्यास कोणच्याही प्रकारचा हक्क आमचेवर व मुलीवर नाहीं. व हीच आह्मी सोडचिठ्ठी समजून मुलीचें लग्न रीतीप्रमाणें दुसऱ्याशीं करून देऊं. ह्मणून दिली नोटीस सही तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १८८९ इसवी.

( सही )
रेणुकाबाई मर्द रावगीर गोसावी इच्या हातची बांगडी असे.

## सूचना.

( लिहून आलेला मजकूर. )

जों जों आमच्या लोकांस विद्येची अभिरुचि लागत चालली आहे तों तों सरकार आपला उदार हात आखडीत चालले आहे. व कांहीं दिवसांनीं तर विद्येच्या प्रसाराचें काम लोकांवरच सोंपवलें जाईल असा अंदाज आतांपासूनच दिसतो आहे. काटकसरीच्या गंदचा अंमल आमच्या वऱ्हाड प्रांतावर जरी अजून फारसा बसलेला दृष्टीस पडत नाहीं तरी पण त्या पासून आपण अगदींच सुटलों आहों असें बरीक ह्मणतां येत नाहीं.

उच्च प्रतीच्या शिक्षणाचा लाभ तर अलीकडे आह्मा वऱ्हाडवासी जनास फारच दुर्मिळ होईल अशीं दुःचिन्हें भासू लागलीं आहेत. ह्या प्रांतांत सरासरीनें दर वर्षी १५ किंवा १६ मुलें प्रवेश परीक्षेंत पास होतात व त्या पैकीं सात किंवा आठ मुलांसच कालेजांतील शिक्षण प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य असतें ह्यांतच वऱ्हाड स्कॉलरशिप मिळालेले धरले तरीं चालतील. ( ह्या स्कॉलरशिपा ठेवण्याचा काय उद्देश होता ह्मणून विद्या खात्यास विचारलें आहे असें ऐकतों का! )

हल्लीं डेक्कन कॉलेजांतील फीचा दर वाढविल्या कारणानें त्या कालेजांतील एकंदर महिन्याचा खर्च २५ रुपयां पर्यंत येऊन पोंचला आहे. साधारण सुखी मनुष्यास एवढा खर्च तीन वर्षे पर्यंत एकाच मनुष्याकरितां सोसणें हें सध्यांच्या कालांत किती कठीण आहे बरें! आणि त्याच्यांतही तो मुलगा एखाद दुसरें वर्षी दुर्दैवानें नापास झाला तर बोलावयासच नको. पुण्यांतील फरग्युसन कॉलेजाची फी जरी पुष्कळ कमती आहे तरी त्या कालेजांत उच्च प्रतीचें शिक्षण पूर्ण मिळण्याचीं साधनें नसल्या कारणानें डेक्कन कालेजांत शिकल्या वाचून गत्यंतरच नाहीं. आह्मास उच्च प्रतीचें शिक्षण तर पाहिजे आहे आणि तें पुणें, मुंबई सारख्या ठिकाणीं मिळण्याचीं साधनें दिवसानुदिवस असाध्य होण्याचा रंग दिसत आहे. तेव्हां ह्या गोष्टीचा आतां पासूनच विचार करणें भाग आहे. आग्रा येथील कॉलेजची हकीगत आह्मी लोकांस विचार करण्या जोगी आहे. ह्या कॉलेजांत डेक्कन कॉलेज पेक्षांही अधिक परिक्षांचे अभ्यास चालतात व कलकत्ता युनिव्हर्सिटीची जितकीं ह्मणून कालेजें आहेत त्या सर्वांत हें पहिल्या नंबरचें आहे. आपणास विशेष विचार करण्या जोगी गोष्ट ही कीं तेथें फी तो अवघी १ रुपये आहे; व अन्नखर्च व इतर किरकोळ ५ रुपये पुष्कळ होतात. ह्मणजे कॉलेजांत रहाणारास दरमहा अवघा ८ रुपयेच कायतो खर्च येतो. कोणीकडे २५ आणि कोणीकडे ८!! आमच्या हायस्कुलांतून सुद्धां एवढ्याशा खर्चांत भागत नसेल.

आतां मुख्य अडचणीची गोष्ट कायतो लांबचा पल्ला! परंतु ह्या प्रांतांतील लोक जर आपली फाजील ममता एकीकडे ठेवतील व आपल्या मुलांच्या भावी कल्याणाकडे लक्ष देतील तर ही अडचण तेव्हांच दूर होईल. सुदैवानें अग्नी रथाच्या साधनें आग्र्या सारख्या सुमारें चारशें कोस दूरच्या शहराव आपणास १२ किंवा १३ रुपये खर्च केले असतां अडीच किंवा तीन दिवसांत सहज जातां येतं.

आमच्या प्रांतांतील मुलें जर तिकडे जाऊन शिकूं लागलीं तर त्यांस व त्यांच्या योगानें त्यांच्या आप्तवर्गी यांस तिकडचीं नामांकित शहरें व स्थानें पहावयास सांपडतील व हिंदुस्थानाचा तो भाग आह्मास जो अगदीं परका भासत आहे तो कांहीं काळानें भासणार नाहीं. पुष्कळ देश फिरल्यानें अनुभव बहुश्रुतपणा व देशज्ञान प्राप्त होण्याचें साधन आमच्या होतकरू विद्यार्थ्यांस अनायासेंच जवळ होईल. अर्थशास्त्र व व्यवहार दृष्टीनें पाहिलें असतां ही वरील सूचना विचार करण्या जोगी आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

## " धंदे शिक्षणाची शाळा "

ही वरील शाळा तारीख २१ जानेवारी

Per ... in arrears
Six monthly.........3

मौजे बहे तालुके वाळवे या गांवीं आप्पा भट बिन दादा भट वैद्य यांचे घरीं सुमारें १९-२० दिवसां पासून असा चमत्कार होऊं लागला आहे कीं, घरांतील कांहीं जिनसा आपोआप बाहेर आंगणांत येऊन पडतात. कांहीं एकदम नाहींशा होतात व पुनः दुसरे दिवशीं त्याच जागीं सापडतात; भलता जिन्नस भलत्याच पदार्थांत मिसळला जातो भाकरी करितां करितां हातांतून नाहींशी होते; नासनांतील कपड्यास आग लागून कित्येक जळून जातात. व बाकीचे शाबीत रहातात; ही आग आपोआप लागते आणि आपोआप विझली जाते. जेवणास बसले असतां एखादे वेळेस पुढचें ताट देखील नाहींसें होतें; एवढेंच नव्हे तर घरांतील बाळंतीण व मूल खांबास बांधलें जातें, अगर अड्यास टांगलें जातें; असे अनेक प्रकार होताहेत यामुळें अप्पा अगदीं त्रासून गेला. व तच्छमनार्थ गुरुचरित्राचे अनुष्ठानास ब्राह्मण बसविला. पोथी ब्राह्मण वाचतां वाचतां नाहींशी झाली ह्मणून पाहूं लागला तों कित्येक अध्याय फाटले जाऊन त्याचे तुकडे घरभर पसरले होते. ते सांपडले. ही गोष्ट कर्णोपकर्णी प्रसृत झाली तेव्हां प्रथम दर्शनी कोणास खरी वाटेना व वाटणारही नाहींच. पण आसपासचे गांवच्या लोकांनीं व आमच्या एका चाणाक्ष व चिकित्सक मित्रानें प्रत्यक्ष पाहून व त्या तऱ्हेनें आपली खात्री करून घेऊन आह्मास कळविलें. तेव्हां मोठमोठ्या विशोधकांच्या समजाप्रमाणें हा पिशाच चमत्कार नव्हे असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. ते घर सोडून देण्याच्या विचारात मालक आहे. यासाठीं पिशाच नाहीं. अशी ज्यांची समजूत असेल त्यांनीं या गोष्टीचें मूळ बीज काय याचा शोध लावून ती बंद होण्याचा उपाय सांगितला तर बिचाऱ्या घरवाल्यांवर महत उपकार होतील. व पिशाच अस्तित्वा विषयीं लोकांचा भ्रमही दूर होईल. तसेंच छा छू करणारे व मंत्र व तंत्र भूत प्रेत खरें मानून त्यांस भजणारे यांनींही आपल्या विद्येचा प्रभाव प्रकट करून हा अनिष्ट प्रकार बंद केल्यास नास्तिकांचीं तोंडें फुटून परमेश्वराचें पुण्य लागणार आहे. समजूनही अमोल संधि त्यांनीं व्यर्थ घालवूं नये असें आमचें त्यास सांगणें आहे. पु० वै०

न जळण्याचा उपाय—जस्ताचा हायड्रोजन ( जलजनक ) वायुशीं संयोग करून नंतर त्या वायूचें पाणी करावें, आणि तें इमारतीच्या लांकडास देऊन तीं इमारतीस बसवावीं ह्मणजे त्यांस अग्नीचें भय नाहीं. असा शोध एका डाक्टरानें काढला आहे.

नवा ठराव—जेव्हां जेव्हां जन्म मृत्यूचे रजिस्टर ठेवणाऱ्या कामगारांस कोणाच्या घरीं जावें लागेल तेव्हां तेव्हां त्यानें १० रुपये फी शिवाय जाण्या येण्याचा भाडे खर्च घ्यावा. १० रुपये फी सरकार जमा करावी आणि भाडे खर्च त्या कामगारानें घ्यावा असें हिंदुस्थान सरकारानें ठरविलें आहे.

खरा महात्मा—अमेरिकन कुबेर मि. ड्यानियल ब्रांड यानें सिदी लोकांस विद्या शिकविण्यासाठीं २०००००० रुपये दिले. ग.मू

सर हेनरी लारेन्स असें ह्मणतात कीं,—हिंदुस्थानच्या राजांशीं तह आह्मी ठरविले आहेत, ते मोडण्याला आह्माला अधिकार नाहीं. त्यांतले कांहीं तह शहाणपणाचे नाहींत, हें खरें आहे; पण, ते जेव्हां ठरविले, तेव्हां फार फायद्याचे होते. आतां आह्मांला कोणी विचारता नाहीं ह्मणून ते आह्मी मोडावे, हें कांहीं ठीक नाहीं.

लार्ड मेयो असें ह्मणतात कीं, हिंदुस्थानच्या संबंधानें आह्मी आपलें कर्तव्यकर्म अद्याप केलें नाहीं,

सर ह्यू रोज असें ह्मणतात कीं, झांशीची राणी-शिपायांच्या बंडानें हिंदुस्थानांत मनुष्य ह्मणण्या सारखें एक उत्पन्न केलें; आणि तें एक मनुष्य ह्मणजे झांशीची राणी होय.

ड्यूक ऑफ वेलिंग्टन असें म्हणतात कीं, राज्यांतली कपटकृति-प्रथमतः तहामध्यें आम्ही राजांस राजे ह्मणतों, आणि स्वतंत्र प्रभु म्हणतों. नंतर आम्ही आपले रेसिडेंट त्यांच्या दरबारीं पाठवितों. ते तेथें वकिलां प्रमाणें न वागतां, जसें काय धनी होऊन बसतात, आणि राजावर अंमल चालवितात, त्यांच्या खासगी आणि सरकारी सगळ्या कामांत हात घालितात; जे राजांशीं विरुद्ध असतात अशा लोकांस फूस देतात; आणि आपल्या अधिकाराचा मोठा डामडौल करितात.

लार्ड लारेन्स असें म्हणतात कीं, इंग्लिशांचें क्रूरपण--इ० स० १८५७ ह्या वर्षी बंडवाल्यांपासून इंग्लिशानीं दिल्ली परत घेतली. त्याची हकीकत वाचून मुंबईचे गव्हर्नर लार्ड एलफिन्स्टन ह्यांनीं सर जान लारेन्स ह्यांस लिहिलें कीं, “इ० स० १७३८ ह्या वर्षी नादिरशहानें दिल्ली घेऊन तेथें जीं क्रूरकर्मे केलीं, तीं, ह्या वेळीं आमच्या इंग्लिश लोकांनीं केलेल्या क्रूरकर्मांपुढें कांहींच नाहींत!”

हिंदुस्थानच्या लोकांवर कर-परकीय लोकांच्या मनांत जर हिंदुस्थान आपल्या स्वाधीन ठेवून त्यावर राज्य करावयाचें आहे, तर, लोकांवर अगदीं थोडा कर बसविणें हाच कायतो त्यास उत्तम उपाय आहे.

लार्ड मेयो असें ह्मणतात कीं, लोकांची असंतुष्टी-आज कित्येक वर्षेंपर्यंत कर वाढतच चालला आहे, त्यामुळें, युरोपियन आणि एतद्देशीय ह्या दोन्ही प्रकारच्या लोकांत असंतोष आणि अतृप्ति हीं चढत चाललीं आहेत. आणखी मला असें वाटतें कीं, हीं जर अशीच वाढत राहिलीं, तर, तीं आपल्या राज्यास अपायकारक होतील, तो आणि तो अपाय किती होईल हें आज सांगतां येत नाहीं.

जोर्ज क्यांबेल असें ह्मणतात कीं, मिठावर जकात-मुसलमानी अमलामध्यें, मिठावर, जकात, हल्लीं आहे तिच्या दहाव्या हिशा इतकी होती.

फासेट असें म्हणतात कीं, मिठावर जकात- सध्यां हिंदुस्थानांत मिठावर जी जकात आहे, ती भारी आहे. अवश्यक पदार्थांवर इतकी जबरदस्त जकात दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं.

लार्ड चर्चिल असें म्हणतात कीं, इंग्लंडाला हिंदुस्थानाची गरज-हिंदुस्थान हा आपला मोठा मोकळा बाजार आहे. जगांत जीं मोठीं बंदरें आहेत, त्यांतलें हें एक आहे, आणि त्यांत आपला माल जाण्यास तिळमात्रही अडचण नाहीं. जकात नाहीं, कांहीं नाहीं. हें जर हिंदुस्थान आपल्या देशाच्या हातून गेलें, तर, बर्मिंगाम येथें इतके लोक बेकार होतील कीं, त्यांचा बंदोबस्त करतां करतां पुरे पुरे होईल.

सर रिचर्ड टेंपल असें म्हणतात कीं, इंग्लंडाला हिंदुस्थान कशा साठीं पाहिजे? इराण, अबिसीनिया, चीन, इत्यादि राष्ट्रांशीं लढाया करण्यास हिंदुस्थान फार उपयोगी पडतें; ह्मणून इंग्लंडास हिंदुस्थान पाहिजे

डाक्टर हंटर असें ह्मणतात कीं, हिंदुस्थानाचे सामार्थ्य-इंग्लिश सरकारचें राज्ययंत्र मनस्वी महाग आहे. त्याच्या हिंदुस्थानांतल्या इंग्लिश कामगारांस पगार मोठमोठे लागतात एवढाले पगार सगळ्या पृथ्वींत दुसऱ्या कोणत्याही राज्यांत नाहींत. त्यांचा- खर्च चालविण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानास नाहीं. पण एतद्देशीय कामदारांचे पगार त्यांच्या बेताचे असतात. त्यांचा खर्च हिंदुस्थान सहज भागवील. ठा० अ०


## जाहिरात.

### डा. नारायण चिंतामण यांनीं मुद्दाम तयार केलेलीं उत्तम गुणकारी औषधें.

सूचना-हीं सर्व औषधें शुद्ध वनस्पतीचीं केलेलीं असून हजारो लोकांनीं अनुभवलेलीं आहेत. रक्तांत दोष उत्पन्न करणारे रसायनांचा ह्यांत बिलकुल उपयोग केलेला नाहीं. जाहिरातींतील औषधांवर लोकांची श्रद्धा बसत नाहीं म्हणून रोग्यांना ह्या सर्व औषधांची गरज पडेल तेव्हां निदान एकवेळ तरी मुद्दाम उपयोग करून पाहवा अशी त्यास माझी सविनय प्रार्थना आहे ह्या सर्व औषधांचा उपयोग शेंकडों रोग्यांनीं करून पाहिला व त्यां पैकीं तीन चतुर्थांश बरे होतात अशी आमची खात्री झाल्या मुळें तीं प्रसिद्ध केलीं आहेत.

गजकर्णावर रामबाण औषध.

ह्याची भर सर्वत्र प्रसिद्धीच आहे. याचे गुणा बद्दल मिळालेल्या सर्टिफिकिटां पैकीं कांहीं माहितीचे कागदांत दिलीं आहेत. किं. दर बाटली ०९ आ. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

खरजेवर हटकून गुणकारी मलम

हें लावलें असतां मुळींच झोंबत नाहीं. तीन चार दिवसांत खरूज बरी होते. याचे ही गुणाबद्दल सर्टिफिकिटें आहेत. किं. दर डबी ०८ आ. बंगी करणावळ ०१ आणा. शिवाय टपाल खर्च.

खात्रीचें नेत्रांजन.

आलेले डोळे, लाली, खुपऱ्या, डोळ्यांतून पाणी येणें, डोळे खुपणें व साग वगैरे सारखे विकार चार दिवसांत बरे होतात. किं. दर बाटली ०७ आ. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

मूळव्याधीवर अद्भुत सर्बत

अवश्य अनुभव घ्या रोग नवीन असल्यास एक बाटलींत काम होतें. रक्त पडणें, आंग सूज व ठणका, हीं तीन चार दिवसांत कमी होऊं लागतात. किं. दर बाटलीस रु. २०४ बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपालखर्च. १ बाटली १२ दिवस पुरते.

मोड असल्यास हें सर्बत घेऊन शिवाय मलम घ्यावें लागतें. किं. दर डबी. ०८ आ. बंगी करणावळ ०१ शिवाय टपाल खर्च.

आंवरक्ताच्या हगवणीवर गोळ्या.

सुमारें आठ दिवसांत मुरडा, आंवरक्त अगदीं बंद होऊन अन्न पचन होऊं लागतें. रोग अगदीं नाहींसा होतो. किं. दरएक २४ गोळ्यांचे डबीस १ रु. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

शीत ज्वर व हिंवावर गोळ्या.

ह्या गोळ्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच. यांचे सेवनानें कितीही दिवसांचे अगर कितीही दिवसांनीं येणारे हींव असो सुमारें चार दिवसांत हटकून बंद होतें. हिंवावर तर ह्या गोळ्यांची क्रिया केवळ जादू सारखी होते किं. दर १६ गोळ्यांचे डबीस १ रु० बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

परम्यावर उत्तम पाक

हा पाक तीन दिवस घेतल्या असतां लघवीची आग व तिडक नाहींशी होऊन पू वाहणें बंद होऊं लागतो. रोग नवीन असल्यास एक बाटली पुरे आहे. नाना तऱ्हेची रसायनी औषधें खाऊन ज्याचा परमा फार विकोपास गेला असेल त्याला दोन बाटल्या घ्याव्या लागतील. किं. दर बाटली ३ रु० बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपाल खर्च.

स्त्रियांच्या धुपणीवर कषाय ( काढा )

धुपणी तांबडी अगर पांढरी असो हा कषाय घेतल्या पासून सुमारें चौथे दिवशीं गुण दिसूं लागतो. गरोदरपणीं सुद्धां हा काढा देण्यास योग्य आहे. किं. दर बाटलीस २०४ रु० बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपाल खर्च १ बाटली १२ दिवस पुरते.

फारच उत्तम सालंमिश्री पौष्टिक पाक.

स्त्री पुरुषांस सारखा गुणावह. ह्याचे सेवनानें अग्निमांद्य, जीर्णज्वर, अन्नद्वेष, अशक्तता, मेंदूची क्षीणता, हात पाय व कंबर दुखणें, व सुस्ती वगैरे सारखे अनेक विकार नाहींसे होऊन कांती वाढते. व धातु शुद्ध होऊन सर्व इंद्रियें बळकट होतात. हा पाक हिवाळ्यांत घेण्यास फारच प्रशस्त आहे. स्त्रियांना बाळंत होऊन दोन महिने झाल्या वर हा पाक अवश्य द्यावा. किं. दर शेर २०४ रु० बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपाल खर्च

खोकल्यावर गोळ्या.

खोकला उष्णते पासून उद्भवलेला असो किंवा थंडी पासून असो ह्या गोळ्या घेतल्या पासून दुसरेच दिवशीं गुण दिसूं लागतो, कास श्वास दमा वगैरे सर्व विकार ह्या गोळ्यांनीं हटकून नाहींसे होतात. डांग्या खोकला व क्षयाच्या खोकल्यावर यांचा फारसा उपयोग होत नाहीं. किं. दर २४ गोळ्यांचे डबीस १ रु० बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

हीं सर्व व आणखी सर्व रोगांवरील औषधें प्रांत वऱ्हाड, आकोलें येथें आमचे दवाखान्यांत विकत मिळतील. व्ही. पेबलनें ही पाठवूं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं पत्ता सुवाच्य लिहावा. ह्या सर्व औषधांचें अनुपानांचे कागद औषधां बरोबर मिळतील कळावे.

नारायण चिंतामण
डाकर.


हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “वऱ्हाडसमाचार” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

ART STUDIO

…ZAR STREET.

…URES PICTURES
PICTURES

PUBLISHED FROM THE FAMOUS
CALCUTTA ART STUDIO.

About 200 sorts of beautifully colored Hindu mytho pictures are for sale at half price till 30 th Vadra 1296 the next Dusserah Festiva.

Particular advantages are held for purchasers of Rs. 5 worth pictures who will receive in addition gratis three pictures of Hindu gods and goddesses and two portraits of the Viceroy any Lady Lansdowne.

Every facility would be afforded to mofussil purchasers in sending to them the pictures free of packing and postage charges. Price lists sent free on application. This is the cheapest chance ever afforded to the Hindu public in securing admirable Hindu sacred pictures at a mere nominal charges.

As it is expected that there will be a general rush for these pictures, purchasers are requested to apply soon in order to avoid disappointment by an early disposal of the stock.

All orders by V. P. Post should advance the cost of the V. P.

Pictures worth less than a rupee cannot be sent in V. P.

CALCUTTA ART STUDIO, 185 Bowbazar Street. CALCUTTA. | N. BISWAS. Manager

" TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

## गृहिणी.

( कुलवधूंच्या ज्ञानवर्धनार्थ व मनोरंजनार्थ मासिक पुस्तक. )

ह्या मासिक … कार्चे आजपर्यंत पंचवीस अंक निघाले व एप्रिल महिन्यापासून तिसऱ्या वर्षास आरंभ झाला. यांत स्त्रियांची चरित्रें, नीति, आरोग्य, पाकशास्त्र, शिवणकाम व स्त्रियांस इतर अवश्य वाचण्याल … विषयांचा समावेश केला जातो. याची सालिना वर्गणी मुंबईत १॥ व बाहेरगांवचे वर्गणीदारांस टपाल हं. निराळे ३ आणे पडतील.

विशेष सूचना गरीब शिक्षक लोकांस हें मासिक पुस्तक ड. ह. सह एकरुपयास दिलें जाईल.

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं पैसे ब नांवें खालील पत्त्यावर पाठवावीत.

वर्गणीदार मिळवून देणारांस योग्य कमिशन दिलें जाईल.

पांच प्रती एकदम घेणारांस एक अंक फुकट दिला जाईल.

म्यानेजर गृहिणी,

## गरमीचे रोगावर औषध,

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समई पतन होते परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्याणी अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचे औषध

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, ढोकळा होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्याणी पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.



K. B. Rele and co's' most efficacious.
PREPARATIONS.

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वमावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतींच्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वमें पडणें, हीं ह्यांच्या शेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचे वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध.

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येतें. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा धाप इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणे.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा नातो, क्षयचा, डांग्या बशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप, जीर्णज्वर, ह्यांवर तर हें रामबाण आहे जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वरताद आहे. ह्यानें भूक लागतें अन्न पचतें किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार, संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधींच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटें मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारी असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी."

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारचीं दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेले मलम, साबू, पोष्याश, टिंकचर्स, सलाईन्स, इनोज, फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारी औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्हाल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं. नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

पत्ता. के. बी. रेळें कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतलि.

सालअखेर ” ७ ” ०८
किरकोळ अंकास.......................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .........०१

Per ... in arrears ... 1Rs. 8 as.
Six monthly..........3 " 8 as.
Single co y ..............................4 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs.
per line over10... 4as.
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 25 FEBRUARY 1889 NO.8

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख २५ माहे फेब्रुवारी सन १८८९ इ० अंक ८

## विक्रीस तयार.

कळविण्यांत येतें कीं बंगाल नागपूर रेल्वे स्टेशन गोंदिया येथें ऐन व बिजाच्या चांगल्या सरळ व जुन्या अशा मयाली सुमारें २००० आहेत. लांबी बारा फुटापासून वीस फूट पर्यंत व चौरस एक फूट. दराची माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणाऱ्याकडे मिळेल.

आबाजी विनायक कॉनन्ट्राक्टर गोंदिया.

## नोटीस.

आंबरसिंग वल्लद भवानी पाटील राहणार मौजे कारंज रमजानपूर तालुके बाळापूर जिल्हे आकोलें यास नोटीस देणार जयराम वल्लद पुरणाजी पाटील राहणार कळंबी माहागांव तालुके बाळापूर नोटीशीनें असें कळवितों कीं तुमची मुलगी नांमें लक्ष्मी ही तुमचे येथें मयत झाली ही माझी भावजय व हिच्या अंगावर जे मी दागिने सोन्या चांदीचे घातले ते खालीं लिहिल्या प्रमाणें:—

सोन्याचे दागिने नथ किंमत रुपये २० व गरसुळी किंमत रु. १०. चांदीचे चांदो चे दागिने कोपरवाळ्या भार २५, पायांतील गुडघ्याचा जोड एक वजन भार ४०, हातची कडी दोन वजन भार १० दहा, गोफ गळ्यांतील ९ नऊ भार, कडी चांदी व पितळ्याची किंमत रुपये १० असे सर्व दागिने आह्मी तुह्माजवळ मागितले असतां तुह्मी फक्त कोपरवाळ्या कडी आणि सोन्याची गरसुळी अशा तीनच जिनसा देतों ह्मणतां बाकी देत नाहीं तर तुह्मास असें कळवितों कीं नोटीस पावल्या पासून सात दिवसांचे आंत दागिने सदरील लिहिल्या प्रमाणें आणून द्यावेत. न दिल्यास रिती प्रमाणें फिर्याद करून निकाल होई पर्यंत जें नुकसान होईल तें व ह्या नोटिशीचा खर्च असें सर्व भरून घेतलें जाईल कळावें तारीख २० माहे फेब्रुवारी सन १८८९ इसवी.

सही

जयराम वल्लद पुरणाजी पाटील रहाणार कळंबे महागांव निशाणी खुद्द.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस साष्टांग नमस्कार वि. वि. बरेंच दिवसांत आपली भेट झाली नाहीं. येत्या अंकीं खालीं लिहिले ह्या चार ओळीस जागा द्याल अशी आशा आहे

श्री गणेश मंदीरांत रावसाहेब देवराव विनायक यांणीं सामाजिक सुधारणा करण्याचे हेतुनें लिव्या वाटून एक सभा भरविली त्यांत मी हजर होतों. अध्यक्षस्थान महाराज नाना साहेबांनीं पतकरलें हो होतें. इतपर्यंत मात्र शुद्धवऱ्हाडींत अलेल्या सर्व गोष्टी अक्षरशा हा बरोबर आहेत. शके १८०९ चे सालांत जाहलेले नियम त्याविषचे प्रमुख मंडळीनीं मोडले. व त्याबद्दल कांहीं जाहले नाहीं तेव्हां इंग्लिश कायद्याप्रमाणें देखील ते निरउपयोगी ठरले तेच नियम सर्वानुमतानें पुन्हा पास जाहले ह्मणून लिहिलें आहे. ही गोष्ट बरोबर नाहीं फक्त पुन्हा कदाचित तेथें लिहिले गेलें असतील इतकेंच काय तें जाहलें यांहून कांहीं नाहीं.

नवीन नियम दोन तीन ठरले ह्मणून लिहिलें आहे. व ते त्यांत दाखल केले आहेत याचे बद्दल ही सदरहू प्रमाणेंच हकीकत आहे. रावसाहेबांनीं बोलतां बोलतां अशी ही गोष्ट सांगितली कीं जरी मला तूर्त ७ मंडळींनीं सह्या करून दिल्या तरी पुरे आहेत. यावरून मात्र माझी अशी कल्पना होत आहे कीं सर्व नियम ह्यांत कांहींतरी नियमित मंडळीच्या कारस्थानानीं जाहले असावेत जर असें असेल तर तुमचे बंधु नापास झाले. सर्वानुमतानें खोटें असें लेख लिहून इतर गांवचे व सभेस न येणारे लोकांस खोटी माहिती देण्याचा बोजा आपले शिरावर घ्यावयाचा बोला घेऊं नयेच अशी त्यांची कान उघडणी करावी व रावसाहेबास ही आमची विनंती आहे कीं कमी समजदार लोकांस त्याची चांगली समजूत करून देऊन त्याची खात्री जाहल्याशिवाय सह्या घेऊन त्यांना विचारांत पाडूं नये. ह्मणजे रावसाहेबे वैद्य यांचे पेक्षां पोक्त विचारी असतील त्यांना मात्र ह्यांत गुतविल्यास हरकत नाहीं. राहिलेली हकीकत पुढें खेपेस देईन लोभ करावा हे विनंती.

अकोला ता. २२-२-८९ } आपला एक "सभासद"

मुकाम वाशीम तारीख १७।२।८९.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

नाशीककर संगीत नाटकार मंडळी या ठिकाणीं बरीच रमली ता. ९-१-८९ रोजीं साभिशाकुंतलाची पाळी होती. प्रयोग सात तास पर्यंत चालला होता दुष्यंताचें काम चांगलें वठलें. नायीकेचें पात्र मात्र वाईट होतें. शाकुंतला फार मोठी असून जुनाट दिसत होती. १४ वर्षांची मुग्ध मुखाची गोरीच पाहिजे होती. असो सरासरीनें खेळ बरा झाला. ला ता. १७-२-८९ रोजीं अखेरचा ह्मणून सौभद्राचा प्रयोग झाला. या ही प्रयोगांत नायीकेचें पात्र चांगलें नवतें. नायीकाचा भाग हा चांगलासा वठला नाहीं. नारदानें आपलें काम बरें केलें. कृष्णानें काम चांगलें केलें व रुक्मिणीनें तर आपल्या रुपल्या फुगण्याचें काम फारच चटकदार वठविलें या दिवशीं आमच्या येथील प्रेक्षक मंडळीनीं आपला गुढ सभ्यपणा व्यक्त करून दाखविला. मंडळीनीं प्रेक्षक स्त्री समूहावर बरीच धुळेची वृष्टी केली फाल्गून मास नजीक जाला असून रंगभूमी सारखें आनंदाचें ठिकाण. त्यांत ही तरुण युवतिसमूह उत्सुक नेत्र कमलांनीं पाहात बसलेला. मग युव्यांनीं गुलाल [illegible] उधळणें सहाजीकच! हा सर्व संगीत नाटक प्रकार आमचे येथें अभिनव असल्या मुळें कित्येक वृद्ध ही या रासक्रिडेस अनुकूल झाले. एकवार मंडळीनें स्त्रियां बसण्याचा मांडव पडला रे पडला ह्मणून कारणा शिवाय आरोळी ठोकून नायकांमध्यें उडालेल्या धांदलीचा व घोटाळ्याचा स्वाद घेतला हा घोटाळा आमच्या मंडळीस मोठा रुचकर लागला! भिष्टानव तो! अभिनवते मुळें कळस व्हावयाचाच!

हवा बरी आहे. थंडी बहुतेक गेली. डे. ए. इ. यांची स्वारी पुसद तालुक्यांत फिरत आहे. जिल्हाधिपतीची स्वारी तिकडेच आहे. सुरज नारायण पंडित सा० यांची स्वारी रिसोडास गेली आहे.

येथें टाऊनहाल बांधण्याचें काम चालूं आहे. सरको काढण्याचें यंत्रही येऊन चालूं झालें. येथील वाचन ग्रहाची स्थिती चांगली नाहीं. जुन्या खोडाचे हातून अशी कामें निभत नाहींशीं झाली ह्मणजे नवीन तरतरीत मनुष्याच्या हातीं द्यावीं हें बरें हिशोब दिशोब प्रसिद्ध व्हावा हे संयुक्तिक दिसतें.

येथील दुसऱ्या नंबरचे पोष्ठ आफिसचे नवीन मास्तर हे मि. नागोराव वासुदेव यांचे बंधु आहेत असें लोक ह्मणतात.

मि० कावळे यांचे जागीं मि० दहीगांवकर यांची आफिसिएटिंग नेमणूक येथील शहर फौजदाराचे जागीं मि० सायंना यांची नेमणूक झाली. हे इंग्रजी बरेंच शिकलेले आहेत. शिकलेले लोक पोलिसांत गेल्यानें काम शहाणपणानें व युक्तीनें चालो मि० सखाराम चो० का० हल्लीं सस्पेंड आहेत. बिचारा कचाटांतुन सुटो.

अपला एक "क्ष"

चिखलदरा तारीख १८।२।८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

येथें तारीख सोळा रोजीं दोनप्रहरीं थोडासा पाऊस पडला. पुन्हा पांच वाजतां सुरू होउन सरासरी तीन चार तास पर्यंत फार जोरानें पडला. थोड्या बहुत गाराही पडल्या येथील गाविलगड नांवाचा किल्ला पहाण्या साराखा आहे. तो चिखलदऱ्या पासून सरासरी दीड मैल लांब आहे. येथें सरकारी बाग आहे. त्यांत नानाप्रकारची झाडें व साहेब लोकांची क्रिकेट बॅल खेळण्याची जागा आहे. येथें सरकारी आफिस, तहशिल कचेरी, पोष्ट आफिस, तार आफिस, दवाखाना, पोलीस स्टेशन आणि शाळा हीं आहेत. थोडे दिवसां पूर्वी इ. पि. डॅन्सी यांचे बंगल्यासमोर एका कारकुनानें झाडाशीं बांधा बोकड होता त्यास रात्रीं वाघानें मारिलें. दुसरें दिवशीं रात्रीं त्या प्रेताचें मांस खाण्या करितां पुन्हा वाघ आला असतां डॅन्सी साहेबानें गोळी घालून वाघास ठार मारिलें. मास्तराचे पगार शाळेंत पोंहोचवावा ह्मणून ज्याना हुकूम आला त्यांनीं प्रकर्ण पुढें चालविलें आहे. निकाल झाल्यावर साद्यंत हकीकत कळवीन कळावें. लोभ असावा ही विनंती.

आपला एक "ड"

(लिहून आलेला मजकूर.)

पंडिता रमाबाईची बरेच दिवसांत वाचकांचो गांठ न पडल्या मुळें कदाचित थोडेसें विसरले असतील, तरी पंडिता रमाबाई कोण व कुठल्या हें सांगण्याची जरुरी पडेल असें आह्माला वाटत नाहीं जरी भेटीचा प्रसंग बरेच दिवसांनीं आला आहे तरी नांव ऐकल्या बरोबर वाचकांची ओळख पटणार आहे. पंडिता बाई बरेच दिवस झाले हिंदुस्थानची रजा घेऊन यूरोप खंडांत व अमेरिका खंडांत पर्यटन करीत होत्या त्या हल्लीं परत आल्या आहेत हिंदुस्थानांतून जरी त्या स्वतः गेल्या होत्या तरी आपल्या आर्य भगिणीला होणाऱ्या दुःखाचा विसर त्यांना पडला नव्हता. व त्यांच्या नित्यर्थच मुख्य हा त्यांचा प्रवास होता असें झटलें असतां चालेल त्यानीं इंग्लडांत व अमेरिकेंत जेथें जेथें व आणखी इतर ठिकाणी त्या ह्मणून गेल्या तेथें तेथें मोठमोठ्या सभा भरवून त्यांत हिंदुस्थानच्या स्त्रियांचें चित्र त्यांना वठेल तितक्या चांगल्या रीतीनें काढून दाखविलें आहे. व त्यांत मुख्यत्वें करून ब्राह्मण व इतर उच्च जातीच्या स्त्रियांत पुनर्विवाहाची चाल नसल्या मुळें त्यांना जन्म कसा घालवावा लागतो याबद्दल त्यांना देववेल तितकी माहिती त्यांनीं दिली आहे यामुळें इंग्लंड, स्काटलंड अमेरिका व त्याच प्रमाणें इतर ठिकाणच्या स्त्रियांनीं आपल्या हिंदुस्थानवासी भगिणीस या दुःखापासून सोडवावें ह्मणून जागोजाग सभा स्थापून फंड जमा केले. व पंडिता बाईला किंवा इतर आर्य भगिणीला त्यांची ज्या ज्या वेळेवर जी जी मदत लागेल ती ती देण्यास त्या अगदीं तयार आहेत व त्याबद्दलची प्रचिती ही लागलीच दिसू लागली आहे.

पंडिता बाईंना येऊन फार दिवस झाले नाहींत तरी त्यांनीं इतक्यांतच असा विचार काढला आहे कीं उच्च जातीच्या बालविधवांच्या शिक्षणाकरितां एक शाळा व राहण्यासाठीं घर स्थापित करावें हा शाळा उंच जातीच्याच लोकांच्या विधवांच्या उपयोगांत आणण्याचा हेतु असा दिसतो कीं एक तर ह्या जातींत पुनर्विवाह करितां येत नाहीं, दुसरें आपलें पोषण करण्या करितां विधवांना कोणाची नोकरी चाकरी ही करतां येत नसल्यामुळें

वशा स्थितींत कुटुंबांतच ओलें कोरडें जें काय मिळेल तें एकवार खाऊन व नेसायाला देतील ते नसून अनाथा प्रमाणें कसें तरी दिवस काढावें लागतात. तर इतर जातींच्या स्त्रिया पेक्षां ह्यांना विशेष जरुरी आहे असें जाणून केवळ त्यांच्याच उपयोगा करितां ही शाळा स्थापावी असा पंडिता बाईचा हेतू. व ती प्रथम मुंबईस कोठ तरी एखाद्या चांगल्याशा जागेंत सुरू होईल. पंडिता बाईच्या ह्या कृत्यास युनाइटेड स्टेट्स आणि कानडा येथील बऱ्याच मोठमोठ्या लोकांनी पूर्ण आश्रय देण्याचें कबूल केलें आहे. सुरुवातीलाच बोस्टन येथें या प्रीत्यर्थ नमलेल्या कमेटीनें ४०००० रुपये पाठवून दिले व शिवाय १० वर्षें पर्यंत दरसाल १०००० रुपये पाठविण्याचें कबूल केलें आहे. डा. भांडारकारांनींही यांस अनुकूळ असें मत दिलें आहे. व या बद्दल एक कमेटी स्थापित होऊन या कृत्यास लवकरच सुरुवात होणार आहे. पंडिता रमाबाईचा या संबंधानें दृढ निश्चय इतका पक्का दिसतो कीं एक जरी उमेदवारीण मिळाली तरी तिच्या करितां सुद्धां शाळा व घर पैशाकडे न पहातां ठेवले जाईल. सुमारें ६० विद्यार्थीणी राहूं शकतील इतक्या पुरती हल्लीं जागा होणार आहे.

ही शाळा स्थापण्याचे मुख्य तीन हेतू आहेत ते हे कीं (१) उंच जातीच्या ब्राह्मण विधवांस रहाण्यास घर व शिक्षण देणें ह्या बद्दल विद्यार्थीणी किंवा त्यांच्या नातलगानीं पैसे दिले असतां घेतले जातील. तरी पैसे देणें कोणाला भाग नाहीं.

(२) ज्यांना वैद्यकी शिकावयाची असेल त्यांना रहाण्या करितां जागा—सदर्हू विद्यार्थीणीला शिक्षण योग्य शाळांतून व दवाखान्यांतून मिळेल.

(३) सर्व जातीच्या मुली करितां एक दिवसाची शाळा.

हल्लीं ह्या तीन गोष्टी मुख्य कराव्या असा पंडिता बाईचा हेतू आहे. शिक्षण मराठी व इंग्रेजी भाषेंत दिलें जाईल व शिक्षण देण्या करितां फिलाडेल्फिया येथील एक चांगली व अनुभवशीर मिस्ट्रेस येणार आहे व तिच्याच अध्यक्षतेखालीं घरही दिलें जाईल. शिक्षण होतां होईल तितकें पूर्ण दिले जाईल व असें शिक्षण देतां यावें ह्मणून पंडिताबाईनें असा एक नेम काढला आहे. कीं विद्यार्थीणीनें दोन वर्षेंपर्यंत शाळेंत राहीन असा बद्दलचा एक करारनामा करून द्यावा.

या प्रमाणें ही शाळा लवकरच चालू होणार आहे तर सुधारकांनीं लवकर त्वरा करावी नाहींतर जागा भरल्या जातील. जागा फार थोड्या आहेत. काय त्या सर्व ६० कांहीं एखादी अशी नवीन टूम निघाली कीं ती केव्हां स्वीकारू असें मुंबई व पुणेकरांना होऊन जाते त्यांत ती युरोपियन फाशनवर असली ह्मणजे मग काय अगदीं त्याजबद्दल बोलणेंच नको.

युरोपियन काम ह्मणजे अगदीं पेटन्ट. त्याच्या चांगुलपणाबद्दल अगदीं प्रश्नच नसतो. टापटीप बेतवात कसा अगदीं झक.

परंतु या सुधारक मंडळीला आमची एवढीच प्रार्थना आहे कीं कांहीं थोडासा विचार करून जें करणें असेल तें करा, नाहींतर आपल्या घरांतील असतील तेवढ्या विधवा पोरी साहिबांनीं दिल्या त्या मडम बाईच्या स्वाधीन करून कीं उद्या लागल्या त्या [illegible] करायाला. फीमेल हायस्कुलचें स्मरण अद्याप लोक विसरले नसतील.

मडमीच्या शिक्षणापासून काय फायदा होणार आहे. झालाच जर कदाचित कांहीं या शाळेपासून फायदा तर नेटिव बायकांच्या शिक्षणापासून होईल. नाहींतर कांहीं नाहीं. फार कशाला हायस्कूलमध्यें सुद्धा जर युरोपियन हेडमास्तर असला तर मुलांना व्हावा तितका फायदा होत नाहीं. शिक्षण केवळ पत्तेतील बुकें शिकविल्यानें पुरे होत नाहीं. शिक्षण चांगलें देण्यास मुलांच्या जातीची, धर्माची, रिवाजाची व त्यांच्या वागणुकीची पूर्ण माहिती पाहिजे आहे व ही ज्यास नाहीं तो योग्य शिक्षक नाहीं असें ह्मटलें असतां चालेल.

स्त्रीशिक्षण हल्लीं चालू आहे व ते मिळेत आहे तेवढे आजकालच्या स्थितींत बस्स आहे. तर मग या शाळेपासून विशेषसा फायदा कोणचा? या शाळेपासून व घरापासून कां पुनरविवाहाची चाल सुरू होणार आहे. पुनर्विवाहासारखी नाजूक चाल चालू होण्यास फार दीर्घ प्रयत्न पाहिजे व ती सुरू झालीच तर हिंदूच्या खटपटीनें होईल अशा पर धर्मस्थ लोकांच्यानें होणार नाहीं सुधारणा ही आंतून होते. बाहेरून कधीं सुधारणा येत नाहीं. व जो पर्यंत विद्येचा प्रसार स्त्रियांत व पुरुषांत चांगला झाला नाहीं व पुष्कळ लोक विद्वान झाले नाहींत तो पर्यंत रमाबाईच्या कृत्यास चांगलेसे यश येणार नाहीं असें अह्मांस वाटते. आपली शाळा चांगली चालावी व ती चिरायु व्हावी अशी जर पंडिताबाईची खरोखर इच्छा असेल तर तिनें युरोपियन स्त्रियांचा त्यांत अगदींच प्रवेश होऊं देऊं नये अशी आमची इच्छा आहे.

---

## वऱ्हाडसमाचार.

मिती माघ वद्य १० शके १८१०

---

## वऱ्हाडांतील व्यापाराचा वार्षिक रिपोर्ट. सन १८८७-८८

सदरहु रिपोर्ट आमच्या टेबलावर येऊन पडल्यास बरेंच दिवस झाले परंतु कार्यबाहुल्यामुळें त्याकडे लक्ष देण्यास सवड झाली नाहीं. आज त्यांतील ठळक ठळक गोष्टी आम्ही आपल्या वाचकांकरितां देतो.

गत साली निरनिराळ्या प्रांतांतून आपल्या वऱ्हाडांत १९७०१५०२ रुपयांचा माल आला व वऱ्हाडांतून बाहेरदेशी २९८९४३१९ रुपयांचा माल गेला. आयांत निर्यात मालांचे हे आकडे १८८६-१८८७ सालच्या आकड्याशी ताडून पाहतां आयांत मालाची संख्या ११९८७८ रुपयांनीं वाढली आहे. व निर्यात मालाची १३९४२७८६ रुपयांनी कमी झाली आहे निर्यात मालाचें हें प्रमाण १८८६-८७ सालपेक्षां फारच कमी ह्मणजे शेकडा ३४ नी कमी झालें आहे. आयांत मालामध्यें धान्य, तेलाचीं बीयें, इमारती लांकडें, साखर वगैरे पदार्थ यांचें प्रमाण फार वाढलें आहे व कोळसा, ताग, कपडा, धातूची भांडीं, मसाले यांचें प्रमाण पुष्कळ कमी झालें आहे, यासाली निर्यात व्यापारामध्यें फारच कमीपणा दिसून येतो. दोन्ही प्रकारच्या व्यापारांत इतकी तफावत पडण्याचें कारण गुदस्त सालची आमच्या खरीपाच्या पिकाची नासाडी होय. वऱ्हाडांतील व्यापाराचे मुख्य पदार्थ कापूस, गहू व तेलाची बियें हें आहेत. खरीपाचें पीकच फसलें तेव्हां कापूस व तेलाची बियें व्हावी तशी पिकलीं नाहींत व त्यामुळें यांचा पुरवठा बाह्यप्रदेशास दर वर्षाप्रमाणें करितां आला नाहीं गहू बरा पिकला पण जवारी फसल्यामुळें प्रांतांतल्या प्रांतांतच जवारी ऐवजी गव्हाचा उपयोग करावा लागला यामुळें तो ही बाहेर गेला नाहीं फक्त कापसाचा व्यापार १ कोटी १० लक्ष रुपयांनीं कमी झाला.

आयात मालास ही हेच गोष्ट लागूं करावयाची. वऱ्हाड प्रांतांचे सर्वस्व शेतीवर अवलंबून आहे. तीच एखाद्या वर्षीं फसली कीं आयात व निर्यात व्यापारांत चलबिचल व्हावयाचीच. तांदुळ, डाळ, गूळ, साखर हे पदार्थ तर नेहमीं आमच्या प्रांतांत बाह्य प्रदेशांतून यावे लागतात. यंदा त्यांत इतर धान्याची ही भर पडली. साखरेचा खप गुदस्त साली झालेल्या लग्नाच्या संख्येमुळें वाढला आहे हें कारण आफिशियेटिंग रेसिडेंट साहेबांस पसंत पडेसें दिसत नाहीं. याबद्दल आह्मांस जे कांहीं सांगावयाचें तें आह्मी रेसिडेंट साहेबांच्या टिकेवर आपले विचार कळवून तेव्हांच सांगूं. कपडे, भांडी, मसाले हे पदार्थ कमी आले याचें कारण हेंच. शेत पिकलें ह्मणजे ४ पैसे हातीं राहणार. खरीपाचें पीक बिघडल्यामुळें शेतकरी लोकांजवळ पैसे राहिले नाहींत. व ह्मणूनच कपडे भांडी वगैरे या खप दरवर्षीप्रमाणें झाला नाहीं.

आमच्या प्रांतांत कापूस चांगला पिकतो खरा पण त्याचा माल तयार करून तो माल व्यापारा करितां बाहेर पाठविण्याचें कसब आमच्यांत अजून आलें नाहीं. कापसाचे गठ्ठे इकडून जात असतात व तें बनविण्याचें काम ही बहुत करून परदेशीय व्यापारीच करीत असतात. आमच्यानें तेवढें देखील होत नाहीं. या प्रेसांची संख्या गुदस्ता एकंदर २६ होती.

या प्रमाणें व्यापाराची संक्षिप्त हकीकत झाली. या रिपोर्टावर टिका करितांना आफिशियेटिंग रेसिडेंट साहेबांनीं शेवटीं शेवटीं जे विचार प्रगट केले आहेत ते मोठे मौजेचे व ध्यानांत ठेवण्या जोगे आहेत करितां त्यांचा सारांष आह्मी येथें देतों.

“रिपोर्टांतील आंकडे बरोबर आहेत असें दर्शविलें आहे; तथापि त्या संबंधानें आह्मास फारच संशय आहे. कारण पारिग्राफ ३-५-६ यांतील आंकडे बरोबर आहेत असें कशावरून? आगगाडीनें जो माल आला व गेला यांतील आंकडे बरोबर आहेत असें धरून चाललें तथापि त्यांतील कांहीं तक्ते त्यांत ज्यांचें नांव आहे अशा लोकांनीं केले आहेत. शेतकरी लोकांनीं जवारी ५० लक्ष एकर, गहूं १० लक्ष एकर व हरबरे वगैरे इतर धान्य २॥ लक्ष एकर जमिनींत पेरलेलें होतें हें आंकडे बरोबर आहेत काय? किंवा आळसी व झोंप घेणाऱ्या चपराशांनीं निजून उठतें वेळेस निरनिराळ्या चिठ्यांवर टिपून ठेविलेले आंकडे नसतील कशावरून? कारण या आंकड्यांची तपासणी कोणीच केली नाहीं. जिल्ह्याचे अधिकारी लोकांनीं पक्कें लक्ष ठेविलें पाहिजे कीं, या आंकड्यांची फेरतपासणी न करितां तसेंच आंकडे घेणें हे अगदीं विश्वसनीय नाहीं. एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, या सालांत वैशाख व ज्येष्ठ महिन्यांत पुष्कळ लग्नें झालीं व ३८,७३२ मण साखरेचा खर्च झाला. तथापि पुढील वाक्यावरून असें दिसून येतें कीं, कांहीं मालाचा खप लागलीच कमी झाला यावरून असें अनुमान काढावें कीं काय कीं, चांगलें पीक आलें नसतां ही लग्नें अधीक होतात; व ह्यांच प्रकारचे इतर आंकडे ही आहेत असें आह्मांस वाटतें.

चालूं वर्षांतील रिपोर्टांत जे आंकडे येतील ते आकडे कसें मिळाले व त्यांची फेरतपासणी कधीं झाली वगैरे सर्व माहिती दिली पाहिजे व जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांनीं आपल्या हपिसांत हे आकडे कसें ठेविले गेले आहेत हें पाहून यांत फेरतपासणी बारीक रीतीनें करीत जावी. कोणत्याही प्रांताचे व्यापारा संबंधीं आंकडे बरोबर असणें हें काम महत्वाचें आहे व या संबंधानें पाहिलें असतां १० वर्षांतील आंकडे जे या रिपोर्टांत दिले आहेत व त्याचा सरासरी दर मणी भाव जो दिला आहे तो महत्वाचा आहे यावरून असें दिसतें कीं, बाहेर जाणाऱ्या मालांत जरी फेरफार झाले आहेत; तथापि प्रांतांत जाणारा माल वाढतच चालला आहे व येणें करून प्रजेची भरभराट आहे असें दिसतें. रुप्याची किंमत फार झाली आहे हें यावरून दिसतें; परंतु आंकडे संशयात्मक आहेत सबब कांहींच मान काढतां येत नाहीं. कारण रस्त्यावरील येणारे जाणारे मालाची ही टिप बरोबर ठेविली नाहीं असें दिसतें

पब्लिक वर्क्स खात्यांत १८८२ पासून ८७ पर्यंत रस्त्या वरून येणारे मालाची टीप ठेवण्या विषयीं कांहीं व्यवस्था केली होती; परंतु ते आंकडे आमचे समोर कधीं आले नाहींत. रेसिडेंट साहेबांचें असेंही मत आहे. कीं, प. व. खात्याकडील रस्ते व इतर रस्ते यां वरील व्यापाराची टीप ठेवण्या करितां चांगला महकमा ठेविल्यास फार उत्तम होईल. व या संबंधीं अधिक खर्च आल्यास कांहीं हरकत नाहीं. त्या योगानें खात्रीचे आंकडे मिळाल्यास ह्या रिपोर्टाला फार महत्वाची माहिती मिळेल व त्या प्रमाणें असें ही ह्मटलें पाहिजे कीं, जे आंकडे हा महकमा ठेवील त्या आंकड्यांची तपासणी फार बारीक रीतीनें झाली पाहिजे. कारण हे आंकडे तपासल्याशिवाय तसेंच घेतल्यास नक्की माहिती मिळणार नाहीं; पुढील रिपोर्टांत या विषयीं व्यवस्था व्हावी. ह्या रिपोर्टांतील कांहीं आंकडे तपासले असतील परंतु ती तपासणी कधीं केली वगैरे याचा कांहींच उल्लेख केला नाहीं व कमिशनरचे आफिसांतून जे आंकडे आह्मांकडे आले त्यावरून तरी असें

वाटतें कीं, ह्या आंकड्यांची बरोबर तपासणी झाली नाहीं. या ठिकवरील आमचे विचार आम्ही पुढें कळऊं.

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 25, 1889.

## AMENDMENT OF THE INDIAN PENAL CODE.

As regards social reformation in India, by the people themselves, experience has taught us that the people and especially the eduated amongst them, not only do possess the necessary enthusiasm for bringing about the reforms but that they have proved themselves incapable of doing anything for themselves. The question nevertheless stands before us all, what means should be employed to effect reforms so that the race may not degenerate and in course of time dwindle away into oblivion.

In times past people of all nations were governed by rules of conduct laid down by Prophets for their guidance. Moses laid down rules of conduct for certain races, Manu did the same for others in India. Later on their places were taken up by Jesus Christ, Mahomed. Buddha, and a host of other great and good men. The great authority that sways the lives of Brahmins and others on this side of the Nurbuda is the great Shankaracharya and his successors. This great authority was once powerful to bring about reforms necessary in those times. But at present the authority of this great man is of no avail at least for purposes of improving the society. It has been found on more occasions than once, that all the existing means of effecting reforms have proved miserable failures.

The only powerful and effective means of bringing about the desired project is the Legislature of the country. In fact all over the world, the existing religions do not now possess the authority of guiding men and women as they once did. Eeven in Social matters, men's lives are regulated by the laws laid down by the person or persons exercising powers politic. India is no exception to this rule.

But the Legislature is a machine that moves very slowly. However slow this machine may be but it is the only effective way of securing the greatest good of the greatest number.

Of late the question of amending the Penal Code in regard to section 375, is raised, and many writers both European and Native have given expression to their views quite favourable to the proposed amendment. The Penal Code lays down different periods of ages for different purposes. As regards the period at which a person can be said to become liable to punishment for the commission of an offence, the legislature fixes the limit of the completion of the 7th year; at this period a person becomes liable to punishment if he has committed an offence. Though this is the case still the law provides that if such person has not attained sufficient maturity of understanding, then he does not become liable till he has completed the 12th year. In regard to kidnapping from lawful guardianship the age of a female is fixed at 14 under which if a person takes this female away he becomes liable to punishment for that offence. Liability to punishment does not arise before the 12th year. Minority for purposes of guardianship in regard to kidnapping ends with the 14th year. It is a strange anomaly that for purposes of rape the age should be fixed at the completion of the 10th year.

Experience and teaching of the medical world has been that a girl is ruined in her health if she is not allowed to remain a vergin until at least she has completed her 14th year. This lession is given to us not by men from Europe but by men of science who have attained high eminence in the science of medicine in India. Those amongst us who have had daughters or sisters or their own young wives know it well that if these relations of theirs have become mothers before 20 they have become so to the detriment and ruin of their own health. Even if these young women have become wives before bodies have received full development, this has been only to their ruin. Under these circumstances, legislature should intervene and provide a mild remedy in the way of improving the status of the woman kind. Those that are in favor of letting things take their own course will not object to this amendment of the section 375 of the Indian Penal Code.

## RAO BAHADUR M. G. RANADE ON THE SOCIAL CONFERENCE.

(Continued from our last issue.)

Fortunately or unfortunately for us, we have our roots in the remote past. Most of our institutions have a common basis. Most of our languages have a common ancient stock. For centuries and centuries we have the same joint family system throughout the length and breadth of India, though foreigners find it hard to conceive how it was possible for so many numbers of one family to live together. We have everywhere, from times immemorial, the same deference from the wife to the husband, from the son to the father and the same notions of charity. I have travelled thrice over India and I found that it was not due to the Common English language that we spoke, but it was owing to the sameness of thoughts and feelings imbibed by us, that we could understand each other. We thus see that though our social and moral ideas require to be reformed, we have a common basis to stand upon and that we are a nation. Well, if we are one nation, then the question remains why we cannot have a social congress. As among our European critics, so among our native critics also, there is a misunderstanding, on the matter. The editor of 'the Reformer' of Poona in one of its issues remarked that the political congress might be a success, for there we had to form resolutions with a view to take away the rights and privileges enjoyed by other people, but in social matters we had to give away, and this we being unwilling to do, the conference would practically be of little avail. I think that this is a very superficial view of the matter. For what are we striving for in the National congress? Are we striving to take away the rights from the Englishmen which they enjoy? No. What we want is to elevate ourselves to such a position that we may claim and be fit to enjoy those rights ourselves. The same is the case in social matters. Here also those who possess rights are not to be deprived of them. But we are to so raise ourselves that we may enjoy the rights possessed by others. The weak is not strong by making the stronger week.

But leaving aside these things, let us ask ourselves the question what are our relations between husband and wife, father and son, brother and sister? The Brahmans may put the same question to themselves with regard to their feelings towards other classes. The work here is not, therefore, of getting privileges, but of widening our sympathies -- of broadening ourselves. The National Congress itself is indirectly helping this work of broadening. It is not a picnic, as some put it, where people meet to eat and drink. The education that one receives by attending such gatherings at the paltry cost of Rs. 50 is not an insignificant thing in itself. If the sight of such a grand gathering does not widen our sympathies and make us liberal-minded, we are indeed hopeless. But all the broadening influences which this intercourse and several other civilising agencies are producing are not the result of a conscious struggle. We cannot therefore let things alone. We are no better for these changes so long as they are unconscious one. We must remember that we cannot be good citizens, if we are bad fathers, bad husbands, bad mothers and bad neighbours. This therefore is a work of conscious effort and sympathy of feeling and aspirations, and not one of resolutions. The social Conference is intended to bring about this work of broadening ourselves. When we know that people from various quarters hold the same opinions on many of the social reforms we feel stronger. I should indeed be very glad if we had an industrial conference next year. I should also like to see all the players in the land meeting together annually. In short we want to receive in the National Congress, our old melas of jatras which have lost their vigour and purpose.—*Sudharak.*

## POSTAL NOTICE.

From the 20 th February 1889 several departments of the Akola Post Office will be open to the public on week-days during the hours shown below:---

| | From a. m. | To pm. |
|---|---|---|
| For disposal of references and applications | 6 | 5 |
| ,, Registration | 6 | 5 |
| ,, Insurance | 6 | 5 |
| ,, Posting Parcels | 6 | 5 |
| ,, ,, Value Payable articles | 6 | 5 |
| ,, Granting certificates of Posting | 6 | 5 |
| ,, Sale of Postage labels | 6 | 5 |
| ,, Issue of money orders | 10 | 4 |
| ,, Savings Bank business | 10 | 4 |
| ,, Sale of British Postal Orders | 10 | 4 |
| ,, Issue of Telegraphic money Orders | 6 | 6 |
| ,, Payment of Telegraphic money orders | 6 | 6 |

## वऱ्हाड.

मि. सी. एच प्राइस ए. अ. क. यांची येथून मोर्शीस बदली झाली.

मि. आरदेसर दिनसाजी चिनाय ए. अ. क. यांची मोर्शीहून एलिचपुरास बदली झाली.

रा. रा. केशवराव जयकृष्ण देशपांडे ए. अ. क. एलिचपुर यांनीं २ महिने २० दिवसांची हक्काची रजा घेतली.

मि. माणिकशा रतनजी ऐ. अ. क. यांची येथील स्मालकाज कोर्ट जज्जाचे जागीं नेमणूक झाली

क्यापटन आर व्ही. ग्यारेट अ. क. यांस अ. क. चे सारे मुलकी अधिकार, क्रि. प्रो. को० कलम ११०(१), १३३(२), १९१(७, ८, ९), आणि २५०(१०) प्रमाणें अधिकार स्मालकाज कोर्टाचे जज्जाचे अधिकार व ५००० रुपये पर्यंत दि० दाव्याचा निकाल करण्याचा अधिकार मिळाला.

मि हायदर अलीखां अब्बाची, दर्यापूर यांस २ महिने ११ दिवसांची हक्काची रजा मिळाली.

रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर ए. अ. क यांची यवतमाळाहून दर्यापुरास बदली झाली.

रा. रा. गणेश बापुजी, तहशिल्दार जळगांव यांस आफूच्या आतंत्या अंदर्च्या खटल्यांचा निकाल करण्याचा अधिकार मिळाला.

मागाहून आलेली नोटीस.

भीमाई नवजे रामकृष्ण गाठे वस्ती आकोट तालुके मजकूर यांस माधव रामजी गाठे वस्ती काजगांव ता. जळगांव वऱ्हाड यांजकडून.

कळविण्यांत येतें कीं तुझी नोटीस ता० २२ माहे नोव्हेंबर सन १८८९ इसवीची पावली यावरून उत्तर देण्यांत येतें. तुझा नवरा मयत झाल्या वेळीं तुझें आंगावर दागिने सोन्या चांदीचे आदमासें रुपये ५००चे असोन खेरीज उंची कपडे रेशमी जरतारी काठी या सुद्धां तूं आपले बापाचे घरीं निघून गेलीस मध्यंतरीं कांहीं दिवस तूं मजपाशीं राहलीस. व कांहीं दिवस आकोटास बापाचे घरी राहलीस. अशी तुझी चाल असल्यामुळें आह्मी तुझ्या दागिन्या बद्दल पांच चार वेळ पुढें तपास केला असतां मजजवळ आहेत असें सांगत गेलीस सबब आम्ही तगादा वगैरे करून दागिनें परत घेतले नाहीत. मी काशीस जाते वेळेस तुजला बरोबर येण्याविषयीं ह्मटले असतां तू आली नाहींस. यामुळें तुझा विचार पाडिला गेला. मी माझी लेक काशी इजला नाशकास नेते वेळेस ही तुला चल ह्मटलें असतां तूं नाशकास ही आली नाहींस. काशीस जाण्याचे अगोदर मजकडे येऊन मला पैसा मागितला असतां तर माझ्या शक्ती प्रमाणें मी तुला कांहीं देऊन रवाना केली असती. आतां तुला जर माझ्या मर्जी प्रमाणें वागणें असेल तर तूं काजगांवीं येऊन मजपाशीं रहावें. मी तुला बाळगण्यास राजी आहे. तुझा दर साल दोन लुगडी तर देत आहे याबद्दल तुझें मन तुला साक्षी देत असेल. तुजपाशीं दागिनें आहेत त्याची व्यवस्था कशी केली याबद्दल विचारणा केली जाईल तूं मला नोटीशीचे उत्तर देण्याचा खर्च करण्यास विनाकारण लावलें आहेस कळावें तारीख २० माहे फेब्रुवारी सन १८८९ इसवी.

(सही.)

माधव रामजी गाठे वस्ती काजगांव तालुके जळगांव वऱ्हाड द. खु.

पोष्टाकडील नोटीस.

हावरा आणि मुंबई याचे दरम्यान ता० २० माहे फेब्रुवारी सन १८८९ इ० रोज बुधवार पासून प्रत्येक बुधवारी एक जादा टपालाची गाडी तूर्त सहा आठवडे पर्यंत निघणार आहे. ही गाडी दर बुधवारीं हावऱ्याहून सायंकाळचे ८ वाजतां निघुन मुंबईस शुक्रवारीं सायंकाळचे तीन वाजतां (ज्या दिवशा पी आणि ओ नांवाची विलायतेस डाक नेणारी अगबोट मुंबईहून विलायतेस जाण्या करितां निघते त्या दिवशीं) पोंचेल. या गाडीनें जीं पत्रें वगैरे जातील त्याजवर मामुली हांसिला खेरीज विलायती पत्रांवर प्रत्येक औंसास दीड आणा. वर्तमानपत्रास प्रत्येक ४ औंसास अर्धा आणा आणि इतर बुक पाकियास प्रत्येक दोन औंसास अर्धा आणा या प्रमाणें ज्यास्त फी पडेल.

अकोलें येथें प्रत्येक गुरुवारीं सायंकाळीं ६ वाजतां पत्रें टाकलीं असतां तीं वरील गाडींत रवाना केलीं जातील आहे कायदा आ...

...करून दिल्या खेरीज ह्याचा ...ा होणार नाहीं. जे मेंबर निव...र ते सुशिक्षित व धीट असें असतील. नाहींतर " माझें मत हो हुकु-

बोलकी बाहुली–मि. इडिसन यांनीं एक बाहुली तयार केली आहे, तिला किल्ली दिली ह्मणजे ती बोलते. तिच्या पोटा मध्यें फोटोग्राफचें यंत्र ठेविलें आहे. आणि तें यंत्र फिरविलें ह्मणजे त्या बाहुलीच्या तोंडांतून शब्द निघत आहेत असें वाटतें. त्यांनीं एक बोलकें घड्याळ केलें असल्या विषयीं ही मागेंच प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. टा. अ.

"मोल्डन ग्यांग अगर सोनेरी टोळी" वरील ओळ वाचून वाचक आश्चर्यांत पडतील व या आवरणांतील वाक्याचा अर्थ समजण्याची त्यांस अत्यंत उत्कंठा होईल ह्मणून फार वेळ संशयांत न ठेवितां त्याचा अर्थ व हेतु आपण स्पष्ट करूं.

सुमारें तीन वर्षांपूर्वीं सदरहू नांवाची एक मंडळी स्थापित झाली आहे. या मंडळीचा व्यवसाय नांवा पेक्षां फार चमत्कारिक आहे. ही मंडळी नागपूर आणि भुसावळ या दरम्यान चालणाऱ्या जी. आय. पी. रेल्वे लाईनवरील सुमारें तेवीस युरोपियन गार्ड लोकांची आहे. यांचा धंदा ब्रेक गाडींत ठेवलेल्या उतारूंच्या पेट्या वगैरे उघडून त्यांतून किंमतवान माल चोरण्याचा आहे. गाडी चालू झाली ह्मणजे ब्रेकमधील पेट्या वगैरे सावकाशपणे उघडून त्यांतून दागिने, उंची कापड इत्यादि सामान काढून घ्यावें. आणि पूर्ववत त्या बंद करून तें सावकाशपणें विकावें असा यांचा क्रम चालून आज तीन वर्षांत सुमारें एक लाख रुपयांचा माल यांनीं चोरला असा अदमास आहे. चोरीचा बोभाट होण्याचा संभव मुळींच नसे, कारण स्टेशनावर माल कोणीही तपासून घेत नाहीं. घरीं गेल्यावर फलाणा जिन्नस हरवला ह्मणून स्वस्थ बसावें झालें. या मंडळींत तीन असामी मुख्य होते त्यांना मंडळीनें पहिला पांपी दुसरा पापी तिसरा पांपी अशीं नांवें दिलीं होतीं.

जानेवारीच्या अखेरीस मि. नील नांवाचे दुसरे पांपी रेल्वे कडील गार्ड यांनीं चाकरीचा राजीनामा दिला परंतु तो कबूल झाला नाहीं याबद्दल रजा घेऊन मुंबई भायखळ्यावर येऊन राहिले आणि रात्रंदिवस चैन सुरू झाली. धंदा कांहींएक न करितां इतका खर्च हा गृहस्थ कुठला करतो असा पोलिसाला संशय आल्यावरून त्यांनीं तपास करितांना या नामधारी पांपीचें कृष्ण कारस्थान उघडें पडलें. यांच्या घराचा झाडा घेतला त्यांत पागोटीं, किनखाप, रेशमी व जरीकाठी धोतरें डोक्याला बांधावयाचे रुमाल व बरेच देशी तऱ्हेचे सोन्या रुप्याचे दागिने सांपडले. शेवटीं यांनीं ही सर्व गोष्ट कबूल करून ही गोष्ट न फोडण्याच्या आपसांत शपथा घेतल्या आहेत वगैरे सांगितलें.

ही मंडळी तूर्त रेल्वे पोलिसच्या ताब्यांत आहे. कर्नल पेटमन साहेब हुशार मेहनती आहेत तेव्हां सर्व चोरांचा पत्ता लागून हिंदुस्थानांतील ठग लोकांप्रमाणें यांचाही बंदोबस्त होईल असें वाटतें.

ही अशी सर्वी व्यर्थ न दवडण्याची रेल्वे ट्राफिक म्यानेजर ही शिकस्त करतीलच.

युरोपियनां बद्दल फाजील अभिमान ट्राफिक साहेब [illegible]तात असा लोकांचा समज होणें उतारूंस टिकिट [illegible]ट तऱ्हेनें वागविणें

वगैरे गोष्टींचा दोष कोणाकडे येतो हें सांगणें नको ड्यूक आफ कानट साहेबांचें जवाहीर रेल्वे प्रवासांत चोरीस गेलें असें ह्मणतात तेव्हां अशा मोठमोठ्या मंडळीवर असा प्रसंग येतो मग गरीब बिचाऱ्या नेटिवांची दाद कशी लागावी.

या कामीं सरकारनीं योग्य लक्ष पुरवून चांगला बंदोबस्त करावा, सरकारची सक्त नजर पाहिजे.

येत्या वर्षीं हिंदुस्थानांतील बादशाही कामाकरितां सर्व प्रांतांच्या सरकारांनीं ७४ लक्ष रुपये द्यावें असें ठरलें आहे. त्या ओझ्याची वाटणी येणेंप्रमाणें:—मद्रास व मुंबई प्रत्येकानें १७॥ लक्ष, बंगाल १०, मध्य प्रांत ३, असाम, वायव्य प्रांत, अयोध्या व ब्रह्मदेश मिळून २९ लक्ष द्यावें. पंजाब मात्र यांतून सुटलें. सु. प.

उंसापासून एका एकरामध्यें जितकी साखर उत्पन्न होतें त्याच्या सहापट साखर सॉर्घम ह्मणून एक झाड आहे त्याज पासून होते असा एका गृहस्थानें शोध लाविला आहे.

आफगाणिस्थानचे अमीर व रशीयन सरकार यांचे दरम्यान लढाई माजण्याचा प्रसंग दिसत आहे.

क्राफर्ड कमिशन प्रित्यर्थ एकंदर ३॥ लक्ष रुपये खर्च लागला असें सरकार तर्फे प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

डान्दर नजीक खडूं साठीं कांहीं मजूर खणीत असतां मनुष्याचे कित्येक सांपळे सांपडले आहेत. व त्यांच्या हातांत लहान लहान तरवारी ही सांपडल्या आहेत.

बांध ऐरणी व्यवस्थित ठेवाव्या अशा उत्तेजनार्थ धारवाड जिल्ह्यांत एका पाटलास सरकारांतून पागोटें बक्षीस देण्यांत आलें. इकडे सर्व कालीच्या पाटलांनीं लक्ष देऊन बक्षीस मिळविण्याची उमेद ठेवावी.

ठराव—आजपर्यंत सर्व राजिष्टर लोकांचा पगार त्यांच्या त्यांच्या जागेचे मानानें मिळत होता परंतु यापुढें अधिकाराच्या मानानें मिळत जाईल. असें सरकार ह्मणतें.

नाणें पाडण्या करितां किंवा नाण्या सारखा उपयोग करण्या करितां धातूचा उपयोग करण्यांत येतो तो न यावा असा संबंधाचें बिल हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौंसिलांत आलें होतें तें पास झालें.

विंचवा कडून चावविणें किंवा हिंसक पशूंच्या मध्यस्थानीं देणें किंवा टोंचून टोंचून मारणें, असल्या कडक शिक्षा तिबेटमध्यें दिल्या जातात, व गुन्ह्यांत कांहीं अंतर मानलें जात नाहीं असें ह्मणतात. चोरीला जी शिक्षा तीच खुनालाही शिक्षा असाही प्रकार आहे. व चौकशीचे पूर्वीं सर्व आरोपीस उलटें टांगून ठेवावयाचें अशी वहिवाट आहे असें ह्मणतात. न्या० सिं०

मोठें बक्षीस— काबूलच्या अमिराचें सेनापति जनरल गुलाम हैदरखान यांणीं इसाक खानाचें बंड मोडण्यांत मोठें शौर्य दाखविलें ह्मणून त्यांस १००००० रुपयांची खिलत बक्षीस दिली असें समजतें. हें बक्षीस अमिरानें कीं अमिराबद्दल हिंदुस्थान सरकारनें हिंदुस्थानच्या कंगाल खजिन्यांतून दिलें!

मतभेद— निजाम सरकारच्या महादी अली व महादी हसन या बड्या कामगारांत डेक्कन-माईनिंग कंपनीच्या बाबतींत जी नवीन व्यवस्था होणार आहे. त्या संबंधानें मतभेद पडला आहे. महादी अलीच्या बाजूस रेसिडेंट असून महादी हसनच्या मताचे सरकारी वकील मि० जार्डिन व मुख्य प्रधान हे आहेत.

प्लंबेगो— हा धातु त्रावणकोरच्या राज्यांत चांगल्या जातीची विपुल आहे असा शोध लागला असून ती जमिनींतून काढण्याचे बाबतींत त्रावणकोर सरकारानें टेंडरें मागविलीं आहेत असें कळतें. शु. सू.

*K. B. Rele and caclousco smosteffi.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांडुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतीमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. हे प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचे वस्ताद औषध.

हें बिनचूक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हें वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम

नव्या, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखम्या घाय इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणे.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा जातो, क्षयाचा, डांग्या वशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हे रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हे कधींच मागें हटले नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारीं असून निर्दोष आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी."

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाइन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाग्याचीं तेलें मलम, साबू, पोट्याश, टिंकचर्स, सल्फाईन्स, क्विनीन, फ्रुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

"TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

बहिऱ्यांस

बहिरेपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद गुण आणणारें सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.
हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.
सन १८७२ चा ९ वा
समजतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यां सुद्धां किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

नांदि
गु०